CMYK

आयपीएल सामना क्र.४१
चेन्नई सुपरकिंग्ज विरुद्ध पंजाब किंग्ज
वेळ : दु.३.३० वा.
स्थळ : चिदंबरम स्टेडियम, चेन्नई

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

आयपीएल सामना क्र.४२
मुंबई इंडियन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स
वेळ : सायं.७.३० वा.
स्थळ : वानखेडे स्टेडियम, मुंबई

www.surajyadigital.com | रविवार, दि.३० एप्रिल २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २११ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# यहाँ के है हम सिकंदर






## हुकले सत्तांतर, उठला बाजार
## प्रस्थापितांनी केले विरोधकांना बेजार

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**जिल्ह्यातील बाजार समित्यांमधील सत्ताधाऱ्यांचा बाजार उठवण्यासाठी कंबर कसून निवडणूक रिंगणात उतरलेल्या विरोधकांचाच प्रस्थापितांनी बाजार उठवला असून 'हम ही है यहाँ के सिकंदर' म्हणत त्यांना बेजार केल्याचे शनिवारच्या निवडणूक निकालावरून स्पष्ट झाले आहे. जिल्ह्यातील आठपैकी निकाल लागलेल्या पाचही बाजार समित्यांवर विद्यमान सत्ताधाऱ्यांनी त्यांची सत्ता कायम राखली असून मतदारांनी विरोधकांचा धुव्वा उडवत त्यांचे सत्तांतराचे स्वप्न उध्वस्त केले आहे. अकलूज, पंढरपूर, कुर्डूवाडी आणि मंगळवेढा या चारही बाजार समित्या या पुन्हा एकदा प्रस्थापितांच्याच ताब्यात गेल्या असून मतदारांनी विरोधकांना बाजाराबाहेरच अडवून ठेवल्याचे चित्र दिसून आले.**



जिल्ह्यातील अकलूज, पंढरपूर, कुर्डूवाडी, मंगळवेढा, अक्कलकोट, दुधनी आणि सांगोला या सात बाजार समित्यांच्या निवडणुका लागल्या आहेत. त्यापैकी अकलूज, पंढरपूर, कुर्डूवाडी बाजार समित्यांच्या निवडणुकांचे निकाल शनिवारी जाहीर झाले.

मंगळवेढा बाजार समितीसाठी शुक्रवारी मतदान झाल्यानंतर लगेच मतमोजणी घेण्यात आली होती. या चारही बाजार समित्यांमधील विद्यमान सत्ताधाऱ्यांनी आपली सत्ता अबाधित राखली आहे. याठिकाणी विरोधकांची डाळ शिजली नाही. विशेष म्हणजे या चारही बाजार समित्यांमध्ये प्रस्थापितांना विरोधकांपेक्षा दुप्पट मते मिळाली आहेत.

**दादाच ठरले दादा :** गेल्या ७० वर्षांपासून अकलूज बाजार समितीवर विजयदादांचे वर्चस्व आहे. यावर्षी त्यांच्या भावकीतील पद्मजादेवी मोहिते-पाटील आणि विजयदादा विरोधक हे एकत्र आले होते. राष्ट्रवादीचे उत्तम जानकर यांच्या नेतृत्वाखाली तगडे आव्हान निर्माण केले होते. मात्र फक्त उत्तम जानकर वगळता अन्य कोणालाही मतदारांनी बाजार समितीमध्ये प्रवेश दिला नाही. विद्यमान मदनसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली १७ जागा जिंकून सत्ता कायम राखली आहे.

**मंत्र्यांनाही भारी पडले आमदारबंधू :** कुर्डूवाडी(ता. माढा) बाजार समितीवर माढ्याचे आ. बबनदादा शिंदे आणि करमाळ्याचे आ. संजयमामा शिंदे यांची सत्ता आहे. त्यांना मंत्री तानाजी सावंत यांचे बंधू शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख शिवाजी सावंत आणि शिंदे बंधूंचे पारंपारीक विरोधक संजय कोकाटे यांनी आव्हान दिले होते. मात्र मंत्रीबंधू शिवाजी सावंत यांची याठिकाणी डाळ शिजली नाही. सर्वच्या सर्व १८ जागा जिंकून आमदार शिंदे बंधूंनी बाजार समितीवर एकहाती वर्चस्व कायम राखले आहे.

**आवताडेंकडे सत्तेचे पारडे :** मंगळवेढा बाजार समितीसाठी भालके-परिचारक गटाने आ.समाधान आवताडे आणि त्यांचे काका बबनराव आवताडे यांच्या विरोधात दंड थोपटले होते. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. आवताडे काका-पुतण्यांनी सर्वच्या सर्व १८ जागांवर मोठ्या फरकाने विजय मिळवत आपली सत्ता कायम राखली आहे. मतदारांनी भालके-परिचारक गटाला बाजूला सारत सत्तेचे पारडे आवताडे यांच्याकडेच दिले आहे.

**नवख्या आबांना खमक्या मालकांचा हिसका :** विठ्ठल कारखान्यात सत्तांतर करून अचानक चर्चेत आलेले अभिजित(आबा) पाटील यांनी माजी आ. प्रशांत(मालक) परिचारकांना तगडे आव्हान देण्यासाठी पंढरपूर बाजार समितीमध्ये स्वत:चे पॅनल उभे केले होते. पण मतदारांनी ते मान्य केले नाही. सर्वच्या सर्व जागा आपल्या खिशात टाकत खमक्या मालकांनी नवख्या आबांना आपला हिसका दाखवत एकहाती सत्ता मिळवली आहे. या निकालाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते.

## बारसू प्रकल्प रद्द करावा; सरकारने आगीशी खेळू नये : शेट्टी

सुराज्य/सोलापूर

बारसू रिफायनरी प्रकरणी स्थानिकांच्या भावना लक्षात घेऊन राज्य शासनाने तो प्रकल्प रद्द करावा. स्थानिक शेतकऱ्यांच्या भावना तीव्र आहेत, त्यामुळे सरकारने आगीशी खेळू नये. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुट्टीवर पाठवून राज्य सरकारने आंदोलकावर केलेला बेछूट लाठीमार हा जनरल डायरलाही लाजवणारा आहे. हा अन्याय शेतकरी कधीही खपवून घेणार नाही, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक माजी खा.राजू शेट्टी यांनी दिला.

**मुख्यमंत्र्यांना सुट्टी नसते**

**मुख्यमंत्री दोन दिवस सुटी घेत असतील तर ते चुकीचेच आहे. अशी सुटी मुख्यमंत्र्यांना घेत येत नसते. उलट सुटी रद्द करुन प्रशासनाने पुढील दोन दिवसात अवकाळीचे नुकसानीचे पंचनामे करावेत, असे आवाहन राजू शेट्टी यांनी केले.**



शनिवार ते सोलापूरच्या दौऱ्यावर आले असता शासकीय विश्रामगृह येथे पत्रकारांशी बोलत होते. राजू शेट्टी म्हणाले की, प्रत्येक पोलीस कर्मचाऱ्यांची नाळ ही शेती जोडली गेली आहे. त्यांचे वडील -भाऊ काळ्या आईची सेवा करतात. बारसू आंदोलनादरम्यान स्थानिक शेतकरी-महिलांवर निर्दयीपणे बेछूट लाटी हल्ला करताना शेतकरी पुत्र असणाऱ्या पोलिसांना मायेचा उमाळा कसा फुटला नाही? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. बारसू येथील शेतकरी चीन, अमेरिकेचा नाही. तेथील स्थानिकांच्या व शेतकऱ्यांच्या न्याय मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभी असणार असल्याचे यावेळी शेट्टी यांनी सांगितले.

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमोल हिप्परगे, युवक अध्यक्ष विजय रणदिवे यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## २ मेपर्यंत राज्यात अवकाळी; हवामान खात्याचा इशारा

सुराज्य/पुणे

आता अवकाळी पावसाचा मुक्काम आणखी ५ दिवसांनी वाढला आहे. २ मेपर्यंत राज्यातील सर्वच भागांत अवकाळी पाऊस राहणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. विदर्भासह उत्तर महाराष्ट्रात जोर जास्त राहील, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यांना अवकाळी पावसामुळे चांगलाच फटका बसला आहे. पावसामुळे राज्यातील शेतकरी संकटात आला आहे. एकीकडे कडाक्याचं ऊन तर त्यात अवकाळी पावसाची बॅटिंग सुरु आहे. अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे झालेल्या नुकसानामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. त्यातच आता अवकाळी पावसाचा मुक्काम



आणखी ५ दिवसांनी वाढला आहे. २ मेपर्यंत राज्यातील सर्वच भागांत अवकाळी पाऊस राहणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. विदर्भासह उत्तर महाराष्ट्रात जोर जास्त राहील, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. यंदा मे महिन्याची सुरुवात पावसाने होत आहे. आठवडाभर अवकाळीचे वातावरण राहणार असून, आगामी चार दिवस राज्यात गडगडाटासह अवकाळीचा जोर राहणार आहे. प्रामुख्याने उत्तर महाराष्ट्रातील शहादा, चोरडा, यावल या भागांसह संपूर्ण विदर्भात पावसाचा जोर जास्त राहणार आहे. कोल्हापूर, सांगली या भागांत जोरदार पावसाचा अंदाज आहे. मुंबईसह कोकणात मात्र हलका ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. आगामी चार दिवस विदर्भात पावसाचा वेग जास्त राहणार आहे. यात यवतमाळ, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली या भागांत सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. कोकणच्या उत्तरेकडील भागातील नागरिकांना उन्हाचा तडाखा सहन करावा लागणार आहे. यात कोकणासह, मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे भागातील तापमानाचा आकडा वाढणार आहे. तर किनारपट्टी भागातील तापमान ३७ अंश किंवा त्यापेक्षाही अधिक होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

## जुनोनीमध्ये विजेची तार तुटून शॉक; १३ वर्षाच्या मुलाचा मृत्यू

**सांगोला :** सांगोला शहर व ग्रामीण भागातील जुनोनी जवळा संगेवाडी मेडशिंगी वाडेगाव सावे आदी परिसरात शनिवारी सायंकाळी चारच्या सुमारास विजेचा कडकडाट अवकाळी पाऊस झाल्याने घराची पडझड झाली. पिकांचे फळबागांचे नुकसान झाले तर वीज पडून म्हशींचा मृत्यू तर विजेची तार तुटून शॉक बसून तेरा वर्षाचा मुलगा मृत्यू झाल्याची घटना घडली.

जुनोनी काळू बाळू वाडी येथे वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. त्यावेळी विजेची तार तुटून व त्या तुटलेल्या तारेचा शॉक बसून समाधान दामोदर शेळके हा तेरा वर्षाचा मुलगा मयत झाला तसेच भोपसेवाडी येथे वीज पडून म्हशींचा मृत्यू झाला आहे. मेथवडे येथे वादळी वाऱ्यासह पावसामुळे ज्ञानेश्वर आनंदा पवार यांच्या घरावरील छप्पर उडाल्याने तसेच ज्ञानेश्वर वामन कांबळे यांच्या द्राक्षांच्या बागांचे मांडव उडाल्याने मोठे नुकसान झाले आहे तर सावे गावात सुखदेव नामदेव वाघमोडे यांच्या राहत्या घराचे वादळामुळे पत्र उडाली असून अनेक कुटुंबे उघड्यावर आली आहे.

## असभ्य वर्तन करून मारहाण; महिला जखमी

सुराज्य/सोलापूर

शेतात मजुरीसाठी जाणाऱ्या महिलेचा पाठलाग करून तिच्याशी असभ्य वर्तन करीत मारहाण करण्यात आली. ही घटना अक्कलकोट तालुका परिसरात शनिवारी सकाळच्या सुमारास घडली.



जखमी महिलेस अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. अक्कलकोट तालुका परिसरात राहणारी ती ३५ वर्षीय महिला शनिवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास शेतात मजुरीच्या कामासाठी पायी निघाली होती.त्यावेळी रमेश कृष्णा भांड या नावाच्या इसमाने तिचा पाठलाग करीत तिला वाटेत अडवले. आणि तिच्याशी असभ्य वर्तन केले. त्यावेळी ती महिला खड्ड्यात कोसळली. तेव्हा रमेश भांड याने तिच्या पोटावर पाय ठेवून बेदम मारहाण केली. हा प्रकार घडल्यानंतर पिडीत महिलेस अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून नातेवाईकांनी सोलापुरात दाखल केले. या घटनेची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## शेअर मार्केटमधून पैसे मिळवून देतो म्हणून लाखाची फसवणूक
### दोघांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर


शेअर मार्केटमधून जास्त पैसे मिळवून देतो असे सांगत टॉवेल शिलाई करणाऱ्या महिलेकडून एक लाख रुपये घेत त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत कस्तुरी अशोक भंडारी (वय-४३,जुना विडी घरकुल) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.




दिनेश माळी नामक मोबाईल धारक व अभिषेक नावाचा बँक खातेदारावर गुन्हा दाखल झाला आहे. भंडारी या गुरूवारी दुपारी घरात असताना दिनेश माळी नामक इसमाने त्यांना फोन केला. त्याने आपण शेअर मार्केट एका कंपनीचा मधील एजंट असल्याचे सांगत वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये ट्रेडिंग करून चांगले आर्थिक फायदा करून देतो असे आमिष दाखविले. त्याने भंडारी यांच्याकडून अभिषेक नावाच्या बँक खातेदाराच्या खात्यात यूपीआय व्दारे १ लाख २ हजार रुपये पाठवण्यास सांगितले. पैसे पाठवल्यानंतर आरोपींशी संपर्क न झाल्याने भंडारी यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यामुळे त्यांनी याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीवरून दिनेश माळी नामक मोबाईल धारक व अभिषेक नावाचा बँक खातेदारावर गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोसई वळसंगे करत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




तुझे क्रिकेट बंद! दोनवेळा अंघोळ शक्यच नाहीये!

कल्याण
280-00-127

## तुळशी वृंदावनातील एकनाथ महाराजांचे मंदिरही कोसळले

सुराज्य/पंढरपूर

**वारकरी संप्रदायासाठी तीर्थक्षेत्र पंढरपुरातील यमाई तलावालगत तुळशी वृंदावन आणि संतांची संगमरवरी दगडामध्ये मंदिरे उभारण्यात आली आहेत. यामुळे वारकऱ्यांना एकाच ठिकाणी सर्व संतांचे दर्शन घेता येत होते. मात्र काही दिवसातच दुसऱ्यांदा संतांचे मंदिर कोसळल्याने या तुळशी वृंदावनाच्या कामाचा दर्जा निकृष्ट असल्याची बाब समोर आली आहे.**

वन विभागाने २०१९ मध्ये पंढरपूर मध्ये साडेचार कोटी रुपये खर्चून तुळशी वृंदावन उभे केले आहे. यासाठी प्रवेश शुल्कही आकारण्यात आले तरीदेखील भाविक आणि पर्यटकातून मोठा प्रतिसाद मिळत असताना आता निकृष्ट कामाचे परिणाम दिसू लागले आहेत. संत चोखामेळा यांच्या मंदिरानंतर आता संत एकनाथ महाराजांचे मंदिरही कोसळले आहे. त्यामुळे भाविकांमध्ये प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली जात आहे.

**▶ दर्जा निकृष्ट असल्याची बाब आली पुन्हा समोर**



काही दिवसांपूर्वी याच तुळशी वृंदावनातील संत चोखामेळा यांचे मंदिर कोसळल्यावर अनेक पक्ष व संघटनांनी संबंधितांवर कारवाई करावी, तात्काळ मंदिर उभारावे, इतर मंदिरांचे ऑडिट करावे अशी मागणी केली होती तर आमदार समाधान आवताडे यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. यानंतर वन विभागाने आता बाकीच्या मंदिराची तपासणी करून डागडुजी करू असे आश्वासन दिले होते. मात्र हे आश्वासन पूर्ण होण्याच्या आताच आज दुसरे मंदिर कोसळल्याने कामाचा दर्जा निकृष्ट असल्याची बाब समोर आली आहे.

या उद्यानात श्रीयंत्राच्या आठ कोपऱ्यात आठ संतांची मंदिरे उभारण्यात आला होती . आता यातील दोन मंदिरे कोसळली आहेत. तर आता उरलेल्या सहा मंदिरांचे अस्तित्व देखील धोक्यात आले आहे. सध्या संत ज्ञानेश्वर , संत तुकाराम, संत सावता माळी, संत जनाबाई, संत कान्होपात्रा आणि संत नामदेव यांचीच मंदिरे याठिकाणी उरली आहेत. वन विभागाने उरलेल्या संतांच्या मंदिरातील मूर्ती तातडीने हलवून त्यांची दुरुस्ती न केल्यास अजून पुढचे अनर्थ घडण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे.

**तातडीने गुन्हे दाखल करण्याची मागणी**

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी पाहणी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. याचबरोबर शिवसेना ठाकरे गट देखील आक्रमक झाला आहे. आमच्या भावना दुखावल्या असून संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर तातडीने गुन्हे दाखल करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

**वनमंत्री मुनगंटीवार यांनी दिले चौकशीचे आदेश**

तुळशी वृंदावन येथील संत एकनाथ महाराज यांचे मंदिर उसळल्याची बाब अत्यंत गंभीर असून तात्काळ अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून सर्व बांधकामाचे स्ट्रक्चरल ऑडिट करून पंधरा दिवसात अहवाल सादर करावा यामध्ये बांधकामाचा निकृष्ट दर्जा निदर्शनास आल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

CMYK

## विजय शंकरची दमदार खेळी

# गुजरातचा कोलकात्यावर सात विकेटने विजय




**कोलकाता : हार्दिक पांड्याच्या नेतृत्वातील गुजरात संघाने कोलकात्याचा सात विकेटने पराभव केला. इडन गार्डन्स मैदानावर कोलकात्याने दिलेले १८० धावांचे आव्हान गुजरातने १३ चेंडू आणि सात विकेट राखून पार केले. विजय शंकर याने वादळी अर्धशतकी खेळी केली. त्याशिवाय शुभमन गिल आणि डेविड मिलर यांनी निर्णायक योगदान दिले. कोलक्याताकडून एकाही गोलंदाजाला चांगली कामगिरी करता आली नाही.**



कोलकात्याने दिलेल्या १८० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना गुजरातच्या सलामी फलंदाजांनी आक्रमक सुरुवात केली. ४ षटकात ४१ धावांची भागिदारी केली. साहा आणि गिल यांनी आक्रमक सुरुवात करुन दिली. साहा याला १० धावांवर रसेल याने तंबूत धाडले. त्यानंतर हार्दिक पांड्या आणि गिल यांनी गुजरातच्या डावाला आकार दिला. हार्दिक पांड्या याने संयमी फलंदाजी केली तर गिल याने धावांचा पाऊस पाडला. हार्दिक पांड्या २६ धावांवर बाद झाला. या खेळींत हार्दिक पांड्याने दोन चौकार आणि एक षटकार लगावले. हार्दिक पांड्यानंतर शुभमन गिलही लगेच तंबूत परतला. शुभमन गिल ४९ धावांवर बाद झाला. गिल बाद झाल्यानंतर गुजरातचा संघ अडचणीत सापडेल असे वाटले होते. पण विजय शंकर आणि डेविड मिलर यांनी गुजरातला विजय मिळवून दिला.

विजय शंकर याने वादळी अर्धशतक झळकावले. विजय शंकरला डेविड मिलर याने चांगली साथ दिली. दोघांनी चौफेर फटकेबाजी केली. विजय शंकर याने २४ चेंडूत नाबाद ५१ धावांची खेळी केली. यामध्ये त्याने पाच षटकार आणि दोन चौकार लगावले. तर डेविड मिलर याने १८ चेंडूत ३२ धावांचे योगदान दिले. या छोटेखानी खेळींत मिलर याने २ चौकार आणि २ षटकार लगावले. कोलकात्याकडून हतेश राणा, रसेल आणि सुनील नारायण यांना प्रत्येकी एक एक विकेट मिळाली. सुयेश शर्मा, वरुण चक्रवर्ती, नीतीश राणा यांची पाटी कोरी राहिली.

दरम्यान, गुरबाजच्या वादळी अर्धशतकाच्या बळावर कोलकात्याने निर्धारित २० षटकात सात विकेटच्या मोबद्लयात १%९ धावांपर्यंत मजल मारली. गुरबाज याने ३९ चेंडूत ८१ धवांची विस्फोटक खेळी केली. गुरबाजचा अपवाद वगळता एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. आंद्रे रसेल याने अखेरचीस ३४ धावांचे योगदान दिले. गुजरातकडून मोहम्मद शमी याने तीन विकेट घेतल्या.

प्रथम फंलदाजी करताना कोलकात्याची सुरुवात निराशाजनक झाली. नारायण जगदीशन पुन्हा एकदा फेल गदेला. जगदीशन याला फक्त १९ धावांचे योगदान देता आले. पुनरागमन करणाऱ्या शार्दूल ठाकूर यालाही मोठी खेळी करता आली नाही. ठाकूर खातेही न उघडता बाद झाला. एका बाजूला विकेट पडत असताना दुसऱ्या बाजूला गुरबाज याची फटकेबाजी सुरुच होती. वेंकटेश अय्यर यालाही इम्पॅक्ट पाडता आला नाही. अय्यर अवघ्या ११ धावा काढून बाद झाला. त्याच्यापाठोपाठ नीतीश राणाही चार धावा काढून बाद झाला. रिंकू सिंह आज मोठी खेळी करण्यात अपयश आले. रिंकू २० चेंडूत १९ धावा काढून बाद झाला. अखेरच्या षटकात आंद्रे रसेल याने फटकेबाजी केली. त्याने १९ चेंडूत ३४ धावांचे योगदान दिले. यामध्ये त्याने ३ षटकार आणि दोन चौकार लगावले.

गुरबाज याने पहिल्या चेंडूपासूनच आक्रमक रुप धारण केले होते. गुरबाज याने अवघ्या ३९ चेंडूत ८१ धावांची खेळी केली. या खेळींत गुरबाज याने सात खणखणीत षटकार लगावले. त्याशिवाय पाच चौकारांचा पाऊसही पाडला. गुरजाब याच्या फंलदाजीमुळेच कोलकाता संघाने सन्मानजनक धावसंख्या उभारु शकला. गुरबाज याने जगदीशनसोबत २३, शार्दूल ठाकूरसोबत २४. अय्यरसोबत ३%, रिंकूसोबत ४% धावांची भागिदारी केली. गुजरातकडून राशिद खान याने सर्वात महागडी गोलंदाजी केली. राशिद खान याचा १०० वा आयपीएल सामना आहे. हा सामन्यात राशिद याच्या पिटाई झाली. राशिद याच्या चार षटकात कोलकात्याने ५४ धावा वसूल केल्या. राशिदला एकही विकेट मिळाली नाही. मोहम्मद शमी याने चार षटकात ३३ धावांच्या मोबदल्यात तीन विकेट घेतल्या. त्याशिवाय जोश लिटिल याने चार षटकात २५ धावा खर्च करत दोन विकेट घेतल्या. नूर अहमद यानेही अचूक टप्प्यावर गोलंदाजी केली. नूर याने ४ षटकात २१ धावांच्या मोबदल्यात दोन विकेट घेतल्या. हार्दिक पांड्या आणि मोहित शर्मा यांन एकाही विकेट मिळाली नाही.

## दुचाकीसह शेती अवजारे चोरणारी टोळी जेरबंद

### पंढरपूर पोलिसांकडून ३८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सुराज्य/पंढरपूर**




दुचाकी सह ट्रॅक्टर, ट्रॉली व शेतीची अवजारे चोरणाऱ्या आंतरराज्य टोळीस पंढरपूर शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून एकूण ३८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आली असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी दिली आहे.

या प्रकरणी सांगोला तालुक्यातील शिरभावी येथील सोमनाथ महादेव दुधाळ, पंढरपूर तालुक्यातील तनाळी येथील सचिन शिवाजी सरगर, उत्तर सोलापूर तालुक्यातील पडसाळी येथील सत्यवान रामहरी भोसले व मोहोळ येथील सागर सुरेश चव्हाण या चार तरुणांच्या टोळीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पंढरपूर परिसरातून मोठ्या प्रमाणात दुचाकी चोरी होत असल्यामुळे शहर पोलिसांनी याबाबत तपास सुरू केला होता. तपासामध्ये परगावहून एक तरुण चोरीच्या दुचाकी विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली. सदर तरुणाला ताब्यात घेतले असता त्याने आपल्या साथीदारांच्या मदतीने पंढरपूर सह सांगोला, मंगळवेढा, सातारा, सांगली, तसेच कर्नाटक राज्यातून दुचाकी, लोखंडी नांगर, ट्रॅक्टर, इंजिन पंप, रोटर, ट्रॉली आदींची चोरी केली असल्याची माहिती दिली. सदर टोळी दुचाकीसह शेतीस लागणारी अवजारे देखील चोरी करून विक्री करीत होती. या टोळीकडून दोन ट्रॅक्टर, दोन ट्रॉली, ३१ दुचाकी व सहा शेती अवजारे असा ३८ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### यांनी केली कारवाई

ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम व शहर पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चिमणाजी केंद्रे, सहाय्यक पोलीस फौजदार राजेश गोसावी, नागनाथ कदम, बिपिन ढेरे, सुरज हेंबाडे, शरद कदम, सचिन इंगळे, दादा माने, शोएब पठाण, प्रसाद आवटी, सुनील बनसोडे, राकेश लोहार, सचिन हेंबाडे, शहाजी मंडले व सायबर शाखेचे अन्वर आतार यांनी पार पाडली.

## धमकी देत ५० हजारांची मागणी; पाचजणांविरुद्ध खंडणीचा गुन्हा

**सुराज्य/बार्शी**




न्यायालयातील ३६ लाख रुपयांचा फसवणुकीचा फौजदारी खटला मागे घे म्हणून धमकी देवून बदनामीकारक पोस्टर शहरात वाटून बदनामी टाळण्यासाठी पन्नास हजार रुपयांची मागणी केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध बार्शी शहर पोलिसात खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. एका महिलेने याबाबत फिर्याद दिली आहे. योगेश वसंत लोखंडे, जुगलकिशोर बन्सिलाल तिवाडी, सतिश सुरेश जाधव, निखिल दत्तात्रय मस्के, ( सर्व रा. बार्शी) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत.

३६ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी फिर्यादीने न्यायालयात यातील संशयित आरोपी योगेश लोखंडे व सतीश जाधव यांचे विरुद्ध फौजदारी न्यायालयात खटला दाखल केला आहे. तो खटला मागे नाही घेतला तर तुझ्या कुटुंबाची बदनामी करीन अशी धमकी दि.२६ एप्रिल रोजी सकाळी योगेश लोखंडे ,जुगलकिशोर तिवाडी ,सतिश जाधव यांनी चारचाकी गाडी घेऊन फिर्यादीचे घरी येऊन दिली. तसेच खटला मागे न घेतल्यास बदनामीकारक पोस्टर वाटप करुन तुझ्या कुटुंबाची व तुझ्या नवऱ्याची बदनामी करीन असे धमकावले. संगनमताने केलेल्या कटकारस्थानामध्ये निखिल मस्के हे ही सहभागी आहेत अशा आशयाची तक्रार दिली आहे. त्यावरून संशयितांवर गुन्हा दाखल झाला आहे.

## अजिक्यराणा पाटलांसह चौघांवर अदखलपात्र गुन्हा

### ठार मारण्याची धमकी

**सुराज्य/मोहोळ**

अजिंक्य राणा पाटील यांच्या सांगण्यावरून तीन जणांनी फिर्यादी महिला व फिर्यादीचा मुलगा याना शिवी गाळ करून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी अजिंक्यराणा पाटील यांच्यासह चार जणांवर मोहोळ पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला .

याबाबत उज्वला महादेव थिटे पाटील (रा. मारुती मंदीरा जवळ, अनगर) यांनी मोहोळ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे .

उज्वला मुलगा जयवंत हा शिवजयंती मिरवणुकीत नाचल्याच्या कारणावरून त्याच्यावर खोट्या ॲट्रासिटीचा गुन्हा दाखल करून उज्वला व त्यांच्या मुलास जिवे ठार मारण्याची धमकी दि .२६ एप्रिल रोजी त्यांच्या घरासमोर संशयीत आरोपी महादेव जगन्नाथ गुंड, महिबुब बागवान , अक्षय देविदास भडकवाड (सर्व रा .अनगर) यांनी आजिंक्यराणा उर्फ व्यंकटेश राजन पाटील यांच्या सांगण्यावरून केल्याचा संशय आहे . त्यामुळे उज्वला महादेव थिटे पाटील रा मारुती मंदिराजवळ अनगर (ता. मोहोळ) या महिलेने मोहोळ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार मोहोळ पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## इंदापूर बाजार समितीवर आ. भरणे- जगदाळेंचे वर्चस्व

**सुराज्य/इंदापूर**

इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीत शेतकरी विकास पॅनलने बिनविरोध झालेल्या ४ जागा व निवडणूक लागलेल्या सर्वच्या सर्व १४ अशा एकूण १८ जागा जिंकीत निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. माजी मंत्री दत्तात्रेय भरणे आणि माजी सभापती आप्पासाहेब जगदाळे यांच्या गटाने बाजार समितीत सत्ता मिळविली आहे. विधानसभा निवडणुकीत तुटलेली ही जोडी पुन्हा एकत्र दिसली आहे.

इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीची साठी १८ जागांपैकी बिनविरोध झालेल्या ४ जागा वगळता उर्वरित १४ जागांसाठी शुक्रवार रोजी ९६.११ टक्के मतदान झाले होते. यामध्ये शेतकरी विकास पॅनल व स्वाभिमानी शेतकरी विकास पॅनल या दोन्हीही पॅनलसह काही अपक्षांमध्ये लढत झाली होती. शनिवार रोजी झालेल्या मतमोजणी मध्ये शेतकरी विकास पॅनलच्या सर्वच्या सर्व १४ उमेदवारांनी विजय मिळविला. तर बिनविरोध झालेल्या ४ जागांमध्ये अनुसूचित जाती जमातीच्या एका जागेसाठी आ.यशवंत विठ्ठल माने, व्यापारी मतदारसंघाच्या दोन जागेसाठी दशरथ पोळ, रौनक बोरा व हमाल मापाडी मतदार संघाच्या एका जागेसाठी सुभाष दिवसे यांचा समावेश आहे.

मतमोजणी केंद्रावर निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर शेतकरी विकास पॅनलच्या कार्यकर्त्यांनी माजी मंत्री दत्तात्रय भरणे, आ.यशवंत माने, आप्पासाहेब जगदाळे यांचेसह विजयी उमेदवारानी गुलालाची उधळण करीत फटाक्याची अतिषणाजी करीत विजय उत्सव साजरा केला.

## जिल्हाधिकारी शंभरकरांना ध्वजारोणचा तिसऱ्यांदा मान

### महाराष्ट्र दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण

**सुराज्य/सोलापूर**



महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६३ व्या वर्धापन दिनानिमित्त १ मे रोजी मुख्य शासकीय ध्वजारोहण जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या हस्ते होणार आहे. मुख्य शासकीय ध्वजारोण करण्याचा तिसऱ्यांदा मान जिल्हाधिकाऱ्यांना मिळाला आहे.

पोलीस परेड ग्राऊंड, पोलीस आयुक्त मुख्यालय येथे सकाळी ८.०० वाजता ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ साजरा केला जाणार आहे. दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात सकाळी ७.१० वाजता ध्वजारोहण होणार आहे. मुख्य शासकीय समारंभात नागरिकांना उपस्थित राहता यावे म्हणून सकाळी ७.१० ते ९ च्या दरम्यान कोणत्याही शासकीय अगर निमशासकीय कार्यालयांनी ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करु नये. ज्यांना असा स्वतंत्र ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करावयाचा आहे, त्यांनी तो १ मे २०२३ रोजी सकाळी ७.१० पूर्वी किंवा ९ च्या नंतर करावा. अशी माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे. सोलापूर जिल्हास पालकमंत्री नसल्यामुळे एकदा तर पालकमंत्र्यांची नियुक्ती झाल्यानंतर राधाकृष्ण विखे पाटील नगरचे देखिल पालकमंत्री असल्याने नगरच्या मुख्य शासकीय ध्वजारोहण उपस्थित राहिल्याने दुसऱ्यांदा तर आत १ मे देखिल तीच परिस्थती निर्माण झाल्याने शासकीय ध्वजारोहणाचा तसऱ्यांदा मान जिल्हाधिकाऱ्यांना मिळाला आहे.

## ‘सारखं काहीतरी होतंय’ नाटकातून दोन पिढ्यांच्या विचारांतील विसंगतीवर प्रकाश

**सुराज्य/बार्शी**

बार्शी नगरपरिषद, भगवंत देवस्थान ट्रस्ट व भगवंत बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शीचे ग्रामदैवत श्री भगवंत प्रकटोत्सवानिमित्त बार्शी येथे होत असलेल्या भगवंत महोत्सवातील तिसरा दिवस प्रशांत दामले व वर्षा ऊसगावकर यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या सारखं काहीतरी होतंय या नाटकाने गाजवला. नात्यातील गमती-जमती, दोन पिढ्यांच्या विचारांतील विसंगती या नाटकातून धमाल विनोदी पद्धतीने मांडण्यात आली.

प्रशांत दामले यांनी केशव करमरकर या पात्रातून घाबरट बापाची भूमिका साकारली आहे. तर वर्षा उसगावकर यांनी इला चीं भूमिका साकारली आहे. प्रशांत दामले आणि वर्षा उसगांवकर यांच्यासोबत या नाटकात पूर्णिमा अहिरे-केंडे, सिध्दी घैसास, राजसिंह देशमुख आदि कलाकारांच्याही यात भूमिका आहेत. सर्वांनीच उत्तम अभिनय करत भूमिकांना न्याय दिला आहे. दोन अंकी नाटकातील धमाल विनोदी संवादातून प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन झाले. प्रारंभी यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुण बारबोले, माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब आडके, चंद्रकांत बारबोले, डॉ भरत गायकवाड, डॉ निनाद माढेकर, डॉ राघवेंद्र अणवेकर, डॉ विक्रांत शहा, वकिल संघाचे अध्यक्ष ॲड अविनाश जाधव, नागेश रुद्रवार, महेश गुडे, अमित येवनकर, गोपाळ मुंदडा, विनोद चोप्रा, गिरीश देशपांडे, भरतेश गांधी, राजेश चांगभले, जवाहर माढेकर, सदानंद गाडे, संतोष शहा, मनीष शहा



आदींच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी महोत्सव समितीचे अध्यक्ष सुभाष लोढा, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, असिफ तांबोळी, विजय राऊत, माजी नगरसेवक, देवस्थान समितीचे सदस्य, महोत्सव समितीचे सदस्य उपस्थित होते. यावेळी डॉ विक्रांत शहा यांनी मनोगत व्यक्त केले. नाटकाच्या मध्यंतरात विजय राऊत तसेच शुभांगी राऊत, कोमल राऊत, अंकिता राऊत यांच्या हस्ते कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमासाठी रावसाहेब मनगिरे, संतोष सूर्यवंशी,अभिजित सोनिग्रा, बाळासाहेब तातेड, ॲड वासुदेव ढगे, विलास रेणके, दीपक राऊत, सचिन मडके, श्रीधर कांबळे, ॲड राजश्री डमरे, वर्षा रसाळ आदी परिश्रम घेत आहेत. मंगेश दहींहडे यांनी सूत्रसंचालन केले. आभार दशरथ मोहिते यांनी मानले.

## बेकायदेशीररित्या ड्रोनचा वापर केल्यास कारवाई

**सुराज्य** : शहर हद्दीत १ ते १५ मे मध्यरात्रीपर्यंत ड्रोन उडवण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत. याबाबतचे आदेश पोलिस उपायुक्त दीपाली काळे यांनी २८ एप्रिल रोजी काढले आहेत.जर कोणी विनापरवाना व बेकायदेशीररित्या ड्रोन प्रक्षेपण व ड्रोनचा वापर केल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# कुर्डूवाडी बाजारसमितीवर आ. शिंदे बंधूंचे निर्विवाद वर्चस्व

## सर्वच १८ जागांवर मिळवले यश; प्रा.सावंत गटाचा पराभव



सुराज्य/माढा

बहुचर्चित कुर्डूवाडी कृषी उत्पन्न बाजार समिती च्या निवडणूकीत सत्ताधारी आमदार बबनराव शिंदे आणि आमदार संजयमामा शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीने सर्व १८ जागा या मोठ्या मताधिक्याने जिंकून आपले वर्चस्व सिद्ध केले. अनुसूचित जाती मतदार संघातील एका बिनविरोध जागेसह निवडणूक लागलेल्या १७ जागावर वैध मतांच्या जवळपास ७५ टक्क्याहून अधिक मते घेत मोठा विजय मिळवला. तर विरोधी प्रा शिवाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय परिवर्तन पॅनलला जवळपास २० टक्के मते मिळाली.

वास्तविक पहाता गेल्या अनेक वर्षानंतर बाजार समितीची निवडणूक लागली.प्रा शिवाजीराव सावंत सह शिवसेना लोकसभा संपर्कप्रमुख संजय कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली मित्र पक्षांना सोबत घेत परिवर्तन करण्याच्या उद्देशाने मोट बांधली होती. मात्र सर्वच मतदारसंघात त्यांना अपयशाला सामोरे जावे लागले. सर्व मतदारसंघातील मिळून ३ हजार ९८३ मतदारापैकी ३ हजार ८११ मतदारांनी हक्क बजावला होता. शनिवारी सकाळी माढा नगरपंचायत सभागृहात सकाळी ८ वाजता मतमोजणीस प्रारंभ झाला. सुरूवातीपासूनच सत्ताधारी शेतकरी विकास आघाडीने आपले वर्चस्व सिद्ध करण्यास सुरूवात केली.सहकारी संस्था मतदारसंघातून विद्यमान सभापती तथा आमदार संजयमामा शिंदे आणि उपसभापती सुहास पाटील जामगावकर यांनी मताधिक्य घेत विजय मिळवला. ग्रामपंचायत हमाल तोलार इतर मागास मतदारसंघात मोठे मताधिक्य घेतले.तर व्यापारी मतदारसंघात विरोधकांना आपले डिपॉझीट गमवावे लागले . निकाल हाती येताच आमदार शिंदे समर्थकानी गुलालाची मुक्तपणे उधळण करीत माढा शहरातून विजयी मिरवणूक काढली. विद्यमान उपसभापती सुहास काका पाटील संचालक दिलीप भोसले आदिं सह नूतन संचालकाना खांद्यावर घेत सर्वानी माजी आमदार धनाजीराव साठे यांच्या निवास्थानी जात आशिर्वाद घेतले.

**विजयी उमेदवार**

सोसायटी मतदार संघ : संजयमामा शिंदे (१४६९), उत्कर्ष देशमुख (१४८३), रमेश पाटील (१४७०), शिवाजी पाटील (१४९५), सुहास पाटील(१४९३), हनुमंत पाडुळे (१४६६) दिलीप भोसले (१४५८). महिला राखीव मतनदारसंघ - निकीता खटके (१५३४), सुमन मोरे (१४९२), इतर मागास वर्ग मतदारसंघ- अमोल देवकर (१५४८). विमुक्त जाती / भटक्या जाती मतदारसंघ वैध मते -किसन पाटील (१५४६), ग्रामपंचायत सर्वसाधारण मतदार संघ वैध मते- नागनाथ पाटील (७२७), विजयकुमार लोंढे ७१२. ग्रामपंचायत आर्थिक दुर्बल- संतोष कर्ण ७४३. हमाल तोलार मतदारसंघ वैध मते - सुरेश बागल ४५९, आडत व्यापारी मतदारसंघ वैध मते- पोपटलाल दोभाडा २०४, सतिश सुर्वे २०२



## छत्रपती शिवाजी मुस्लीम ब्रिगेडवतीने ईद साजरी

**सोलापूर** : छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने शुक्रवारी साखर पेठ येथे ईद ए मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात सर्व समाजातील प्रतिष्ठीत व्यक्ती उपस्थित राहून समाजाला संबोधित केले. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर शहर काझी सय्यद अमजदअली काझी, शिवधर्म समन्वयक नेताजी गोरे, सिध्देश्वर देवस्थानचे मुख्य पुजारी राजशेखर हिरेहब्बू, गुरूद्वार गुरूनानक दरबारचे ग्यानी रमेश सिंग, माजी आमदार दिलीप माने, माजी आमदार नरसय्या आडम, माजी महापौर आरिफभाई शेख, राजन जाधव, अमोल बापू शिंदे, पद्माकर काळे, श्रीकांत घाडगे, प्रमोद गायकवाड, डॉ. निलोफर बोहरी, विष्णू कारमपुरी, माजी नगरसेवक तौफिक शेख, रियाज हुंडेकरी, अमर पुदाले, राजकुमार राठी, नसीर अहमद खलिफा, सुधीर खरटमल, श्रीदेवी फुलारे, नलिनी कलबुर्गी, माऊली पवार, के. बी. नदाफ, श्रीकांत डांगे यांची प्रमुख उपस्थिती होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सोलापूर पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने हे उपस्थित होते. संयोजक हाजी मतीन बागवान यांनी प्रास्ताविकेत कार्यक्रमाचा उद्देश सांगितला. त्यानंतर प्रमुख उपस्थितांचा सत्कार समारंभ संपन्न झाला.

## एसआरपीएफ कॅम्पमधून जाणारा डीपी रस्ता करून देण्याची मागणी

**सोलापूर** : एसआरपी कॅम्प भागात राहणाऱ्या आठ सोसायटींमधील नागरिकांना रस्ता बंद करण्यात आल्याने त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे महापालिकेने या भागातील डीपी रस्ता करून द्यावा अन्यथा येणाऱ्या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकणार असल्याचा इशारा सोरेगाव हद्दवाढ विकास मंचच्या अध्यक्षा छबु पौळ यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे. एस आर पी कॅम्प मागे राहणाऱ्या अश्विनी कॉलनीसह विविध ८ सोसायट्यात जवळपास २५०० -३ हजार लोक अनेक वर्षापासून राहतात. अलीकडेच कोरोना काळात एसआरपी अधिकाऱ्यांनी हा डीपी रस्ता भिंत बांधून बंद केला. तत्कालीन महापालिका आयुक्त चंद्रकांत गुडेवार यांनी रस्ता करून देण्याचे आश्वासन दिले होते. या भागातील नगरसेवकांनीही रस्त्याबाबत आग्रही भूमिका घेतलेली नाही. तसेच आमदार सुभाष देशमुख यांनीही तीन महिन्यात रस्ता करून देतो असे आंदोलकांना सांगितले. पण आता नऊ महिने झाले तरी रस्ता झालेला नाही. हा रस्ता बंद केल्यामुळे सोसायटींमधील लोकांना मुख्य प्रवेशद्वारापर्यंत म्हणजे दीड किलोमीटर चालत यावे लागते. आत येणाऱ्या वाहनांना प्रवेश मिळत नाही अशी व्यथाही महिलांनी मांडली. त्याचबरोबर एसआरपी अधिकाऱ्यांकडून महिलांना ओळखपत्र विचारणे, दरवाजावर हटकणे, फोटो काढणे असे प्रकार होत असल्याच्या तक्रारीही महिलांनी सांगितल्या. या पत्रकार परिषदेस कौशिया कांबळे, मीनाक्षी जाधव, प्रिया परदेशी, विठाबाई पवार, विनायक परदेशी आदी उपस्थित होते.

## मराठी पाऊल पडते पुढे चित्रपट ५ मे रोजी होणार प्रदर्शित

**सोलापूर** : स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी संघर्ष हा आढळ आहे आणि तो करण्यासाठी आजचा मराठी तरुण कुठेही कमी पडत नाही. फक्त पाठीवर हात ठेवून लढ म्हणणाऱ्यांची गरज आहे. ही गरज प्रेरणा आणि ऊर्जा प्रभावी मनोरंजनाद्वारे देण्यासाठी मराठी पाऊल पडते पुढे हा मराठी चित्रपट शुक्रवार दि. ५ मे २०२३ रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार असल्याची माहिती निर्माता प्रकाश बाविस्कर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या चित्रपटामध्ये चिराग पाटील, सिध्दी पाटणे, ज्येष्ठ अभिनेते अनंत जोग, सतीश पुळेकर, सतीश सलागरे, संजय क्षेमकल्याणी आणि प्रदीप कोथमीरे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाच्या माध्यमातून येणाऱ्या निव्वळ नफ्यातील दहा टक्के रक्कम कलाकारांना तसेच उर्वरित रक्कमही मराठी तरुणांना व्यवसाय मार्गदर्शनासाठी, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी आणि वृद्धाश्रमासाठी देणार आहेत. तेव्हा हा चित्रपट प्रत्येकाला पहावाच लागेल असा आहे. त्याचबरोबर चित्रपटाचे लकी ड्रॉ तिकीट मिळवण्यासाठी ८९ ५५ ४४ ११ ३३ या मोबाईल क्रमांकावर मिस कॉल देण्याचे आवाहन निर्माता प्रकाश बाविस्कर यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेत अभिनेत्री सिद्धी पाटणे, संतोष बोगले आदी उपस्थित होते.

## पैशासाठी विवाहितेचा छळ

**सोलापूर** : लग्नात खर्च झाल्याच्या बदल्यात माहेरून तीन लाख रुपये घेऊन ये म्हणत छळ केल्याप्रकरणी पतीसह सात जणांवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत सिमरन अनिल मकानदार (वय-२२,रा.मोमीननगर,मुळेगाव रोड) यांनी फिर्याद दिली आहे.फिर्यादी सिमरन यांचे अनिस मकानदार याच्याशी २०२२ मध्ये विवाह झाला.विवाहानंतर सासरच्या मंडळींनी फिर्यादीला त्रास देऊ लागले.शिवाय लग्न खर्चापोटी ३ लाख रुपये घेऊन ये म्हणत फिर्यादीला मारहाण करत होते.शिवाय त्यांना उपाशी ठेवून शिवीगाळ दमदाटी करत होते.याप्रकरणी सिमरन यांच्या फिर्यादीवरून पती अनिस मकानदार,सासू रेश्मा,सावत्र सासू शबाना, सासरे बंदू भाईफ,आजी सासू शन्नोबी,दीर दाऊद, सलीम (सर्व रा.सादेपूर मंद्रूप) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोना कांबळे करत आहेत.

# अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीवर मोहिते-पाटील गटाचे वर्चस्व

- १८ पैकी १७ जागांवर मिळवला विजय
- पद्मजादेवी मोहिते पाटील, के.के.पाटील पराभूत
- विरोधकांमधून उत्तमराव जानकर विजयी

सुराज्य/अकलूज

अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीत सत्ताधारी विजयसिंह मोहिते-पाटील पँनलने १८ पैकी १७ जागा मिळवत सत्ता राखली. विद्यमान अध्यक्ष मदनसिंह मोहिते-पाटील हे विजयी झाले तर विरोधी गटातून राखीव जागेवर उत्तम जानकर ३० मतांनी विजय मिळवत बाजार समितीत प्रवेश केला.या निवडणुकीत विरोधी गटातील पद्मजादेवी मोहिते-पाटील व क के पाटील यांना पुन्हा एकदा पराभव पत्करावा लागला. निवडणूक निकाला नंतर सत्ताधारी मोहिते-पाटील गटाच्या समर्थकांनी गुलालाची उधळन व फटाक्याची अतिशबाजी करीत जल्लोषात विजयोत्सव साजरा केला.

अकलूज बाजार समीतीच्या निवडणुकीत १८ जागेसाठी ३६ उमेदवार रिंगणात उभे होते. या निवडणुकीत सहकारी संस्था सर्वसाधारण मतदार संघ व ग्रामपंचायत मधुन अनुसुचित राखींव अशा दोन ठिकाणी उत्तम जानकर यांनी निवडणुक लढवली होती.सहकारी संस्था सर्वसाधारण मतदार संघात जानकर हे पराभूत झाले मात्र ग्रामपंचायत मधुन अनुसुचित राखींव जागेवर ३० मतानी ते निवडून आले. या निवडणुकीत माजी जिल्हापरीषद उपाध्यक्ष बाबाराजे देशमख, बाजार समीतीचे माजी उपाध्यक्ष मामा पांढरे आदी विजयी झाले आहेत. या निवडणुकीत भाजपाचे के.के. पाटील यांनी राष्ट्रवादीच्या उत्तम जानकर यांच्याशी घरोबा केल्याने त्यांच्याकडे सर्वांचे लक्ष लागले होते मात्र त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. मामासाहेब पांढरे यांनी त्यांचा पराभव केला.



**विजयी उमेदवारांना मिळालेली मते....**

सहकारी संस्था सर्वसाधारण मतदार संघ विजयी उमेदवार बाबुराव कदम (१०२०), शिवाजी चव्हाण (१०१६), लक्ष्मण पवार(१००३), बाळासो माने-देशमुख (१०१७), मदनसिंह मोहिते पाटील (१०४३), मारुतराव रुपनवर(१००९), नितीन सावंत (९९५). सहकारी संस्था - क) इतर मागासवर्गीय मतदार संघ विजयी उमेदवार भानुदास राऊत (१०६९). सहकारी संस्था - ब) महीला राखीव मतदार संघ विजयी उमेदवार मेघा साळुंखे (१०४५) अमृता सुरवसे (१०२०). ड) विमुक्त जाती/भटक्या जमाती मतदार संघ विजयी उमेदवार संदिप पाटील (१०७६) तर सर्वसाधारण विजयी उमेदवार शहाजीराव देशमुख (५९५)बापुराव पांढरे (५५१) तर पराभुत उमेदवार केशवराव पाटील (४८१), पद्मजादेवी मोहिते-पाटील (४६०).ग्रामपंचायत मतदार संघ - ब) अनुसुचित जाती/जमाती विजयी उमेदवार उत्तम शिवदास जानकर (५५४).व्यापारी मतदार संघ विजयी उमेदवार महावीर गांधी(३१९) आनंद फडे (३१५) तर पराभुत दिपक महादेव गरड, हमाल तोलार मतदार संघ विजयी उमेदवार उध्दव डांगरे(१४४) , अर्थिक दुर्बल घटक मतदार संघ विजयी उमेदवार तर परभुत पोपट रंगनाथ भोसले (५८५)

**विरोधकांचा बार फुसका**

माळशिरस तालुक्यातील मोहिते पाटील विरोधकांनी मार्केट कमिटीच्या निवडणुकीत वज्रमूठ बांधण्याचा प्रयत्न केला असला तरी एकटे उत्तमराव जानकर निवडून आल्याने त्यांच्या मनोमिलनाचा आणि एकतेचा फुसका बार निघाल्याची चर्चा सध्या तालुक्यात रंगताना दिसत आहे.

## भालेवाडी येथे गर्भवती महिलेस मारहाण

**मंगळवेढा** : भालेवाडी (ता.मंगळवेढा) भांडण सोडविण्यास गेल्यानंतर पोटात लाथ मारल्याने पूजा राजेंद्र माने (वय २३) ही गर्भवती महिला जखमी झाली. ही घटना शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली.

मंगळवेढा येथे प्राथमिक उपचार करून विठाबाई (सासू) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. माने यांच्या घराजवळ भांडण चालू होते.त्यावेळी पूजा हीचे पती राजेंद्र माने हे भांडण सोडविण्यास गेले होते. त्यावेळी पूजा पतीला आणण्यासाठी गेली होती. तेंव्हा आशाबाई गडगिरे या महिलेने तिच्या पोटात लाथ मारल्याने ती जखमी झाली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

## चॅम्पियन ट्रॉफीमध्ये नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमी विजयी

सुराज्य/सोलापूर

पंढरपूर येथे झालेल्या चॅम्पियन ट्रॉफीमध्ये निलेश गायकवाड क्रिकेट अकादमीने विजेतेपद पटकावले. यामध्ये ४ संघांनी सहभाग घेतला होता. अंतिम सामना नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमी आणि पंढरपूरच्या नागेश साळुंके क्रिकेट अकादमी



यांच्यात झाला. निलेश गायकवाड क्रिकेट अकादमीने हा समा ना ६५ धावांनी जिंकला. तन्मय कथकदंड सामनावीर ठरला तर वीरांश वर्माला सर्वोत्कृष्ट यष्टिरक्षक घोषित करण्यात आले. राजेंद्र गोटे १४ वर्षाखालील मुलांच्या निवड समिती चेअरमन, निलेश गायकवाड अकॅडमीचे संस्थापक रविकुमार वर्मा, राहूल म्हेत्रे, राजेंद्रसिंह बोमरा यांचे विशेष सहकार्य यांना लाभले.

## गणपतराव साठे जि.प.प्रशालेची यशाची परंपरा कायम

**माढा** : माढ्यातील सहकारमहर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेच्या ४९ विद्यार्थी एनएमएमएस (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा) व सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले असून चालू वर्षीही प्रशालेची यशाची परंपरा कायम राखली आहे. गेल्या काही वर्षात प्रशालेतील १९६ विद्यार्थ्यांना ८६ लाख ६८ हजार आठशे रूपयांची शिष्यवृत्ती मिळत आहे.



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांनी घेतलेल्या एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत या वर्षी प्रशालेतील आठवीचे वीस विद्यार्थी व २९ विद्यार्थी सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले. २० विद्यार्थ्यांना दरमहा रुपये एक हजार रूपयांप्रमाणे नववी ते बारावीच्या शिक्षणासाठी प्रत्येकी ४८ हजार रूपये तर सारथीच्या २९ विद्यार्थ्यांना दरमहा आठशे रुपयांप्रमाणे नववी ते बारावीच्या शिक्षणासाठी ३८ हजार चारशे रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. दोन्ही मिळून प्रशालेतील विद्यार्थ्यांना वीस लाख ७३ हजार सहाशे रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. साक्षी चवरे, अमृता चवरे, रिद्धी घाडगे, श्रेया डुचाळ, श्रुती झुंडरे, संस्कृती मोरे, सृष्टी भांगे, आनंद माळी, अमित साळुंके, संचिका साळुंके, कृष्णा गुंड, वैभव देवकर, ईशांत घायाळ, आर्यन पाटोळे, श्रुती संतोष पवार, यश थोरात, निशांत पवार, प्रथमेश टिंगरे, श्रुती गौतम पवार, संस्कृती जगताप यांनी यश मिळवले.

यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार शंभूराजे मोरे, झुंजार भांगे, आनंदराव कानडे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष धैर्यशील भांगे, नगरसेविका अर्चना कानडे, मुख्याध्यापक नागेश खेडकर यांच्या हस्ते करण्यात आला. विद्यार्थ्यांचे नगराध्यक्षा मिनल साठे, जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे, संत कुर्मदास कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे, झुंजार भांगे, मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, शिक्षणाधिकारी संजय जावीर, गटशिक्षणाधिकारी बंडू शिंदे, विस्तार अधिकारी विकास यादव, धैर्यशील भांगे, उपाध्यक्षा लीना राऊत, वर्गशिक्षक चव्हाण आदींनी अभिनंदन केले.

## 'मन की बात'चा आज १०० वा भाग; भाजपकडून जोरदार तयारी

**सोलापूर** : रविवार दिनांक ३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता पंतप्रधान नरेंद्र मन की बात चा १०० वा भाग प्रसारित होणार आहे. या कार्यक्रमाची भाजपकडून जोरदार तयारी करण्यात आली आहे. या संदर्भातही भाजपाची शांती सागर मंगल कार्यालय नगरसेवक, पदाधिकारी, मंडल, आघाडी, मोर्चा व कार्यकारिणी सदस्यांची बूथ सक्षमीकरण बैठक विभागीय संघटन मंत्री मकरंदजी देशपांडे यांच्या उपस्थितीत झाली.

शहरातील सर्वच्या सर्व ७४६ बूथ मध्ये सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, नगरसेवक, मंडल, आघाडी मोर्चा, पदाधिकारी यांनी मन की बात स्वतःच्या बूथवर करावे व अन्य बूथवर ही करण्याचे




आयोजन करावे, असे देशपांडे यांनी सांगितले. याप्रसंगी शहर अध्यक्ष विक्रम देशमुख, संघटन सरचिटणीस रुद्रेश बोरामणी, संजय कोळी, डॉ.किरण देशमुख संगीता जाधव, शिवानंद पाटील नागेश वल्याळ, अमर पुदाले श्रीनिवास करली, अविनाश बोमड्याल, प्रा. नारायण बनसोडे रवी कैय्यावाले सोनाली मुटकरी, मेनका राठोड, राजश्री चव्हाण, अंबिका पाटील, कल्पना कारभारी, विजयालक्ष्मी गड्डम, वैभव हत्तुरे, विनायक विटकर, डॉक्टर राजेश आणगिरे, ज्योती बमगुंडे, बिरू उपस्थित होते.

### • नवी पेठेतील रस्त्याने घेतला मोकळा श्वास

# महापालिका अतिक्रमण पथकाची सुट्टी दिवशीही कारवाई

**चारचाकी गाडी, ड्रेस पुतळा, लोखंडी टेबल्स इतर साहित्य केले जप्त**

सुराज्य/सोलापूर

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या पथकाने आज शनिवारी सकाळी सुट्टी दिवशी नवी पेठ परिसरात कारवाई केली. यामुळे या बाजारपेठेतील रस्त्याने मोकळा श्वास घेतला. दरम्यान पथकाने नवी पेठेतील रस्त्यावर लावण्यात आलेले चार चाकी गाडी, टेबल, लोखंडी स्टुल्स, ड्रेसचे पुतळे यासह इतर साहित्य जप्त केले आहे.

शहरातील मध्यवर्ती ठिकाणची एक प्रमुख बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी पेठेत रस्त्यांवर साहित्य ठेवणे, चार चाकी गाड्या लावणे यामुळे रहदारीस अडथळा ठरत असल्याने सोलापूर महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक




विभागाकडून शनिवारी सुट्टी दिवशीही सकाळीच ११ वाजण्याच्या सुमारास ही कारवाई मोहीम हाती घेण्यात आली. मोठ्या पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली. यापूर्वी महापालिकेचे अतिक्रमण विरोधी पथक नेहमी मेकॅनिक चौक मार्गे नव्या पेठेत कारवाई करत पुढे येत असते मात्र आज शनिवारी सुट्टी असूनही हे पथक नेमके राजवाडे चौक मार्गे कारवाई करत आले. यामुळे व्यापाऱ्यांना लवकर अंदाज आला नाही.

अचानक कारवाई होत असल्याने धावपळ सुरू झाली. काही व्यापाऱ्यांनी दुकानासमोर रस्त्यावरच डिजिटल फलक, कपड्याचे स्टॅन्ड, टेबल, ड्रेस पुतळे यासह इतर साहित्य अडथळा ठरेल असे लावण्यात आले होते. असे साहित्य या पथकाने जप्त केले. कारवाईचे पथक पाहताच नवी पेठेतील चार चाकी गाडी वाले यांची धावपळ सुरू झाली. आणि ते गाडी घेऊन पसार झाले. यावेळी पथकाने एक चार चाकी गाडी जप्त केली. या मोहिमेत नवी पेठ परिसरात कारवाई करून पथकाने १ चार चाकी गाडी, ड्रेससह पुतळे, टेबल, स्टुल्स, डिजिटल फलक यासह इतर साहित्य जप्त केले. यावेळी महापालिका प्रतिबंधक विभागाचे अधिकारी - कर्मचारी यांच्यासह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

**पुतळ्याला घातलेला महागडा ड्रेस परत देण्याची विनंती**

या कारवाईमध्ये एका दुकानासमोर लावण्यात आलेले ड्रेससह पुतळे जप्त केले. दरम्यान, संबंधित व्यापाऱ्याने त्या पुतळ्यावरील ड्रेस महाग आहेत. ड्रेस परत करा अशी विनवणी केली मात्र महापालिकेत येऊन नियमानुसार रितसर कार्यवाही करून आपले साहित्य घेऊन जावा असे, महापालिका अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

**नियमितपणे कारवाई करण्यात येईल : घोलप**

सोलापूर शहरात रस्त्यावर रहदारीस अडथळा होईल असे अतिक्रमण केल्यास नियमितपणे कारवाई करण्यात येईल. साहित्य जप्त करण्यात येईल. तेव्हा अतिक्रमण करू नये, असे आवाहन महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी केले आहे.

# पंढरपूर बाजार समितीवर परिचारक गटाचा झेंडा

## अभिजित पाटील गटाचा पराभव

सुराज्य/पंढरपूर

**पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर सत्ताधारी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी आपला झेंडा कायम राखला असून विरोधी अभिजीत पाटील गटाचा मोठा मताधिक्याने पराभव केला.**



पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये सत्ताधारी परिचारक गटाला विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी आव्हान दिले होते. मात्र परिचारक गटाने तीस वर्षा पासून असलेली बाजार समितीवरील आपली सत्ता कायम राखली. सत्ताधारी गटाचे सर्व तेरा उमेदवार मोठ्या मताने विजयी झाले. यानंतर कार्यकर्त्यांनी गुलाल उधळून एकच जल्लोष केला.

बाजार समितीच्या एकूण १८ जागा पैकी परिचारक गटाच्या पाच जागा बिनविरोध झाल्या होत्या. उर्वरीत १३ जागेसाठी निवडणूक झाली व या सर्व जागा सत्ताधारी गटाने मोठ्या मताने जिंकल्या. या निवडणुकीमध्ये भालके-काळे या गटाने तटस्थ भूमिका घेतली होती. सुरूवातीला या दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांनी अर्ज दाखल केले होते. मात्र अखेरच्या दिवशी हे अर्ज मागे घेतले. यामुळे एकास एक अशी ही लढत झाली. दरम्यान येथील शासकीय गोदामात शनिवारी सकाळी आठ वाजता निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.वैशाली साळवे यांच्या उपस्थितीमध्ये मतमोजणीस सुरूवात झाली. सहा टेबलवर ४२ कर्मचारी यासाठी कार्यरत होते. सुरूवाती पासूनच सोसायटी व ग्रामपंचायत मतदार संघात परिचारक गटाने आघाडी घेतली. पंढरपूर तालुक्यात सोसायटी मतदार संघात परिचारक यांचे एकहाती वर्चस्व आहे. यामुळे या मतदार संघात सत्ताधारी गटाने विरोधी पाटील गटाचा १ हजार ७०० मतांनी पराभव केला. तर ग्रामपंचायत मतदार संघात देखील विरोधकांचा ४०० मतांनी पराभव केला. या एकहाती विजयामुळे पांडुरंग परिवारातील कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. शासकीय गोदामपासून ते छत्रपती शिवाजी महाराज चौका पर्यंत गुलाल उधळून व हलगीच्या ठेक्यावर मोठी मिरवणूक काढण्यात आली.

### अनैतिक पद्धतीने निवडणूक लावली

विजयानंतर माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी पत्रकारांशी बोलताना, केवळ विरोधाला विरोध करण्यासाठी म्हणून अनैतिक पद्धतीने निवडणूक लावली असल्याचा आरोप केला. बाजार समिती ही शेतकऱ्यांची संस्था असून यामध्ये राजकारण आणू नये असा संकेत आहे. पांडुरंग परिवाराची सत्ता आल्यापासून बाजार समितीची उलाढाल २० कोटी वरून आज ५०० कोटीच्या घरात गेली असून भविष्यात देखील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त सुविधा देणार असल्याचे परिचारक यांनी सांगितले.

### पंढरपूरचे नाव देशभर घालवणाऱ्यांना अनैतिक चा अर्थ समजला नसावा : पाटील

प्रशांत परिचारक यांच्या वाक्याला धरून अभिजीत पाटील यांनी देखील प्रशांत परिचारक यांचा चांगला समाचार घेतला. ज्यांनी सैनिकाच्या पत्नी बद्दल अनैतिक बोलून पंढरपूरचे नाव देशभरात घालवणाऱ्या ना अनैतिक शब्दाचा अर्थ समजला नसावा, अशी टीका अभिजीत पाटील यांनी केली आहे. या निवडणुकीत हार झाली मात्र मतदारांनी चांगलं मतदान आमच्या पॅनल केलं तसेच अनेक नवीन सहकारी या निवडणुकीच्या माध्यमातून जोडले गेले आहेत, असे अभिजीत पाटील यांनी सांगितले.

विजयी उमेदवार व मतं

सोसायटी मतदार संघ- हरीश गायकवाड १ हजार ९५७, राजू गावडे १ हजार ९५०, दिलीप चव्हाण १ हजार ९५०, तानाजी पवार १ हजार ९५३, हरिभाऊ ङ्गुगारे १ हजार ९४६, महादेव बागल १ हजार ९४६, संतोष भिंगारे १ हजार ९३०, शारदा अरुण नागटिळक १ हजार ९६६, संजीवनी बंडू पवार १ हजार ९५३, महादेव लवटे १ हजार ९८६, ग्रामपंचायत मतदार संघ- अभिजीत कवडे ६८६, पंडित शेंबडे ६८६, हमाल व तोलार मतदारसंघ आबाजी शिंदे ६४. ग्रामपंचायत मतदार संघ- विक्रम आसबे २९१, शशिकांत पाटील ४, अनिल बागल ४, विवेक मांडवे २७९, विठ्ठल रणदिवे २, हमाल व तोलार सुधाकर शिंदे १२ तर वसंत चंदनशिवे, शिवदास ताड, सोमनाथ डोंबे, यासीन बागवान व नागनाथ मोहिते हे पाच उमेदवार यापूर्वीच बिनविरोध झाले आहेत.

# गांजा विक्रीसाठी नेणारा तरुणाला अटक

## दोन दिवसांची कोठडी

सुराज्य/सोलापूर

विक्रीसाठी गांजा घेऊन आलेल्या तरुणाला बार्शी शहर पोलिसांच्या पथकाने पाठलाग करुन पकडले. त्याला येथील न्यायालयात हजर केले असता न्या. जे. आर. पठाण यांनी दोन दिवस पोलीस कोठडी सुनावली.

अक्षय अर्जुन गाडे (वय २९, रा.वाणी प्लॉट न.२, बार्शी) असे पोलीस कोठडीतील आरोपीचे नाव असून पोलिसांनी २८ एप्रिल रोजी सांयकाळी बार्शी शहरात आझाद चौकातील एका हॉटेलजवळ ही कारवाई केली. याबाबत पोलिस कॉन्स्टेबल अर्जुन गोसावी यांनी फिर्याद दिली असून त्याच्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. जवळ गांजा बाळगून त्याची विक्री करण्यासाठी एक तरुण शहरात फिरत असल्याची माहिती शहर पोलिसांना मिळाली होती.

शहर पोलिस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक तोडरमल, हेड कॉन्स्टेबल चौधुले, पोलीस नायक माने , मुळे, साबळे, घोंगडे, जाधव यांच्या पथकाने आझाद चौकात सापळा रचला. एका हॉटेलजवळ तो येताच पोलिसांना पाहून तो पळत सुटला. पोलिसांनी पाठलाग करुन पकडले. त्याच्या जवळील पिशवीत तीन हजारांचा गांजा आणि रोख ८०० रुपये मिळाले. पोलिसांनी ते जप्त केले.

# मंगळवेढा बाजार समितीवर आवताडेंचे दुसऱ्यांदा वर्चस्व

## १३ बिनविरोध तर निवडणुकीतून ५ जागा जिंकल्या

सुराज्य/मंगळवेढा




मंगळवेढा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पाच जागांसाठी झालेल्या निवडणुकीत सत्ताधारी बबनराव आवताडे व आमदार समाधान आवताडे यांच्या नेतृत्वाखालील गटाचे पाचही उमेदवार मोठ्या फरकाने विजयी झाले. संस्था मतदारसंघात राष्ट्रवादीच्या महिला तालुकाध्यक्षांना अवघी दोन मते पडल्याने त्यांचा दारुण पराभव झाला. सर्व १८ जागा जिंकून बाजार समितीत आवताडेंनी बाजी मारली.

१८ जागा असलेल्या बाजार समितीमध्ये १३ जागा यापूर्वीच आवताडे चुलते- पुतण्यांनी एकत्र येत बिनविरोध केल्या. पाच जागांमध्ये संस्था मतदारसंघातील दोन व ग्रामपंचायतमधील तीन अशा पाच जागांसाठी ९ उमेदवार निवडणुकीच्या आखाड्यामध्ये होते.

सलगर बु, भोसे, मंगळवेढा या तीन मतदान केंद्रांवर जवळपास ९२ टक्के मतदान झाले. मतदानानंतर इंग्लिश स्कूलमध्ये मतमोजणी घेण्यात आली. संस्था मतदारसंघामध्ये ९२४ पैकी ८०० मतदान झाले. त्यापैकी चार मते बाद झाली. संगीता कट्टे यांना अवघी दोन तर कविता बेदरे, सविता यादव यांना प्रत्येकी ७९४ इतकी मते पडली.

ग्रामपंचायतमध्ये एकूण ५६५ मतदान झाले होते. त्यामध्ये जगन्नाथ रेवे ४३६, गंगाधर काकणकी ४४१ व सोमनाथ माळी यांना १०१ इतकी मते पडली. या प्रवर्गात सोमनाथ माळी यांचा पराभव झाला तर ग्रामपंचायत विभागातील एका राखीव जागेसाठी पांडुरंग कांबळे ४२०, हौसाप्पा शेवडे ८२ व वैभव सोनवणे यांना फक्त एक मत पडले. या प्रवर्गात पांडुरंग कांबळे हे विजयी झाले. पाच जागांसाठीच्या मतदानामध्ये पाचही उमेदवार मोठ्या फरकाने विजयी झाले.

बाजार समितीच्या गत निवडणुकीत देखील आवताडे गटाने १८ जागा जिंकून निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले होते. यंदाच्या निवडणुकीत १३ जागा यापूर्वीच बिनविरोध केल्या.

### समविचारी आघाडीचा पराभव

दामाजी'नंतर दुसरी मोठी सहकारी संस्था ताब्यात घेण्याचा समविचारी आघाडीने प्रयत्न केला; परंतु पुरेसे मतदार नसल्यामुळे त्यांनी या निवडणुकीतून माघार घेतल्याचे जाहीर केले. शेतकऱ्यांशी संबंधित असलेल्या या सहकारी संस्थेवर मतमोजणीनंतर वर्चस्व अबाधित राहिल्याबद्दल आवताडे समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी व गुलालाची उधळण करत जल्लोष साजरा केला.

# वीट येथे पूर्वीच्या भांडणावरून काठीने मारहाण




सोलापूर : वीट (ता.करमाळा) येथे पूर्वीच्या भांडणावरून वाटेत अडवून काठी आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत ईश्वर भास्कर आवटे (वय ५०) हे जखमी झाले . ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली . ईश्वर आवटे हे गावातून घराकडे निघाले होते. त्यावेळी बालाजी दीपक धुमाळ, ईश्वर धुमाळ आणि अन्य दोघांनी त्यांना मारहाण केली. करमाळा येथे प्राथमिक उपचार करून त्यांना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात सुनंदा (पत्नी) यांनी दाखल केले . तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे .

# विठ्ठल-रुक्मिणी मंदिर सरकार नियंत्रण मुक्तीची याचिका म्हणणे मांडण्याचे आदेश

सुराज्य/पंढरपूर




श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर सरकारी नियंत्रणातून मुक्त करावे, यासाठी ज्येष्ठ विधिज्ञ डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. त्याची सुनावणी शुक्रवारी न्यायमूर्ती संजय गंगापूरवाला आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्यापुढे सुरू झाली. राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्ता डॉ. वीरेंद्र सराफ यांनी सरकारची बाजू मांडली. न्यायालयाने दोन्ही बाजूंना त्यांचे आणखी म्हणणे लेखी स्वरूपात दाखल करण्यास सांगितले असून, आता पुढील सुनावणी ५ जुलै रोजी होणार आहे.

स्वामी यांच्या मते, संविधानानुसार एखाद्या हिंदू मंदिरात आर्थिक बाबींचे पालन होत नसेल असे सरकारला वाटले तरी ते मंदिर सरकार कायमस्वरूपी ताब्यात घेऊ शकत नाही. तथापि, संबंधित मंदिरातील आर्थिक विभागाची चौकशी करून त्यामध्ये सुसूत्रता आणून पुन्हा संबंधितांकडे सुपूर्द केले पाहिजे. संविधानानुसार सरकार मंदिरांचे नियंत्रण करू शकत नाही, परंतु तरीही सरकारकडून देशातील काही मंदिरांचे नियंत्रण केले जात आहे, हे चुकीचे आहे.

तमिळनाडूमध्ये प्राचीन नटराज मंदिर आहे. ते तेथील सरकारने ताब्यात घेतले होते. त्या विरोधात तेथील मंडळींनी न्यायालयात दाद मागितली होती. परंतु न्यायालयाने विरोधात निकाल दिल्याने संबंधित पुजारी आणि भक्तगण हताश झाले होते. तेव्हा तेथील साधुसंतांनी सरकारच्या विरोधात न्यायालयात दाद मागावी अशी मागणी आपल्याकडे केली होती. त्यानुसार आपण न्यायालयात याचिका दाखल केली होती आणि त्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार ते मंदिर सरकारी नियंत्रणातून मुक्त झाले. तो निकाल देशातील सर्व मंदिरांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असा आहे. त्याच निकालाच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या संदर्भातील जनहित याचिका आपण दाखल केल्याचे स्वामी यांनी यापूर्वी स्पष्ट केलेले आहे. मुंबईत न्यायालयातील कामकाज झाल्यानंतर डॉ. स्वामी यांनी पत्रकारांना माहिती देताना सांगितले की, संविधानातील कलम ३१, ए १ बी नुसार सरकार एखाद्या संस्थेतील व्यवस्था सुधारण्यासाठी सरकार तात्पुरती व्यवस्था करू शकते परंतु कायमस्वरूपी ताब्यात ठेवू शकत नाही. न्यायालयाने महाधिववक्त्यांना संविधानातील संबंधित तरतुदींच्या अनुषंगाने थेट म्हणणे विचारले आणि लिखित स्वरूपात म्हणणे मांडण्यास सांगितले. त्यामुळे आज आम्हाला न्यायालयाकडून अपेक्षेपेक्षा दुप्पट मिळाले असून, आता जुलै महिन्यातच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर सरकारी नियंत्रणातून मुक्त होऊ शकेल, असा विश्वास डॉ. स्वामी यांनी व्यक्त केला.

### भाजलेल्या वृद्धेचा मृत्यू

सोलापूर : चुलीवर चहा करताना साडीचा पदर पेटून भाजून जखमी झालेल्या कमलाबाई देवप्पा वाघमारे (वय ८३ रा.बोरगाव ता.तुळजापूर ) या सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना शुक्रवारी रात्री मयत झाल्या. ७ एप्रिल रोजी सकाळच्या सुमारास हा प्रकार घडला होता. त्यांना भाजलेल्या अवस्थेत बाबू (मुलगा) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. सिव्हील पोलीस चौकीत नोंद झाली आहे .

**महिलेचा मृत्यू**

बाथरूम मध्ये गेल्यानंतर चक्कर येऊन खाली कोसळल्याने गौसिया हुसेन शेख (वय ३२ रा.शास्त्रीनगर, सोलापूर ) ही महिला उपचारापूर्वीच मयत झाली. ही घटना शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. गौसिया शेख ही दुपारी ३ वाजेच्या सुमारास घरातील बाथरूम मध्ये गेली होती. त्यावेळी हा प्रकार घडला.

# मनपा सुंदराबाई डागा शाळेत पडले चिमुकल्यांचे पहिले पाऊल

सुराज्य/सोलापूर



मनपा मुलांची मराठी शाळा सुंदराबाई डागा, दमानी नगर, सोलापूर येथे आज शाळा पूर्वतयारी मेळावा अंतर्गत पहिले पाऊल उपक्रम घेण्यात आला.

बालवाडीतून इयत्ता पहिलीमध्ये दाखल विद्यार्थ्यांना फुगे व फुले देऊन तसेच विद्यार्थ्यांचे औक्षण करुन स्वागत करण्यात आले. यावेळेस विद्यार्थ्यांच्या मातांना 'शाळेतील पहिले पाऊल' ही कार्यपुस्तिका देण्यात आली व वर्गशिक्षिका कावेरी पवार यांनी या कार्यपुस्तिका उन्हाळ्याच्या सुट्टीत कसे सोडवून घ्यायचे याबाबत मार्गदर्शन केले. शाळा पूर्वतयारी मेळाव्यात मार्गदर्शन करताना शाळेचे मुख्याध्यापक नागेश गोसावी म्हणाले की, इयत्ता पहिलीला दाखल पात्र बालकांची शाळा पूर्व तयारी व्हावी व विद्यार्थी शाळेतील पहिल्या वर्गात सहज रुळावेत यासाठी आजच्या मेळाव्याचे आयोजन केले आहे. शाळा पूर्व तयारी या उपक्रमात नाव नोंदणी, शारीरिक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक गणनापूर्व तयारी, पालकांना मार्गदर्शन असे ७ स्टॉल तयार करण्यात आले होते. यामध्ये त्यांचे वजन उंची घेणे, चित्र ओळखणे/ रंगवणे ,अक्षर ओळखणे, अक्षर लेखन, चित्रावरून गोष्ट सांगणे, वस्तू मोजणे, अंक ओळख यावर आधारित पूर्वतयारी घेण्यात आली. मेळाव्यास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा भारती वाघमारे उपस्थित होते. मेळाव्यासाठी मुख्याध्यापक नागेश गोसावी , धीरज कुचेकर , राजीव क्षिरसागर, गिरीश कुरुडे, बालवाडी शिक्षिका अनुपमा जावळे , शिपाई श्रीशैल भागानवरु यांनी परिश्रम घेतले.

## सोलापूरचा सुपुत्र करणार देशातील द्राक्ष उत्पादकांचे नेतृत्व

# द्राक्ष विकास परिषदेच्या प्रथम अध्यक्षपदी पवार

सुराज्य/सोलापूर



भारतीय द्राक्ष विकास परिषदेच्या अध्यक्षपदी श्री. शिवाजीराव लक्ष्मण पवार यांची निवड झाली. श्री. शिवाजीराव पवार हे होणसळ (जि. सोलापूर) येथील प्रगतशील द्राक्ष शेतकरी असून महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे विद्यमान अध्यक्ष आहेत.

सन २०१३ साली भारतीय द्राक्ष विकास परिषदेची स्थापना झाली असून तिची पहिली कार्यकारी सभा काल दि. २८ एप्रिल रोजी पुण्यात संपन्न झाली. सदर सभेत श्री. शिवाजीराव पवार यांची एकमुखाने परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाली. भारत हा जगातील प्रमुख द्राक्ष उत्पादक देत असून महाराष्ट्रात प्रामुख्याने प्रगत द्राक्ष बागायत केली जाते.

भारतीय पेठेसोबतच आंतरराष्ट्रीय द्राक्ष बाजारपेठेत भारतीय द्राक्षांची वाढती मागणी लक्षात घेऊन भारतीय द्राक्षांच्या गुणात्मक वाढीसाठी आणि द्राक्ष शेतीतील प्रगत तंत्रज्ञानाच्या विकासासाठी भारतीय द्राक्ष विकास परिषदेची स्थापना करण्यात आली आहे.

सोलापूरचे सुपुत्र श्री शिवाजीराव पवार यांची द्राक्ष विकास परिषदेच्या च्या एकमताने अध्यक्ष पदी निवड करण्यात आली. यानिमित्ताने देशातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या संस्थेचे नेतृत्व सोलापूरचा सुपुत्र करणार आहे.

# बसवेश्वरांचे साहित्य, वचने नव्या पिढीसमोर आणा : डॉ. स्वामी

## विद्यापीठात महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचे उद्घाटन

सुराज्य/सोलापूर



बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी समताधिष्टीत समाजाची निर्मिती करून समाज सुधारण्याचे महान कार्य केले. आंतरजातीय विवाह असो अथवा जातीभेद, अंधश्रद्धा निर्मूलन तसेच स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार असो त्यांनी त्यावेळी प्रस्थापितांच्या विरोधात जाऊन कार्य केले. दोन हजार वचने लिहिली, असे बसवेश्वरांचे विचार, वचने नव्या पिढीसमोर आणून या अध्यासन केंद्राचे नाव देशभर करा, असे आवाहन विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांनी केले.

सोलापूर विद्यापीठात महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचे उद्घाटन डॉ. स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस या होत्या. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. राजेश गादेवार, बसव साहित्य प्रचारक डॉ. आप्पासाहेब पुजारी, डॉ. बी. बी. पुजारी, कुलसचिव योगिनी घारे, वित्त व लेखाधिकारी सीए श्रेणिक शाह, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. शिवकुमार गणपुर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. केदारनाथ काळवणे प्रास्ताविक व स्वागत केले. डॉ. स्वामी यांनी या अध्यासन केंद्रात बसवेश्वरांच्या वचनांवर संशोधन व्हावे तसेच साहित्य देखील इतर भाषेमध्ये अनुवादित झाले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कुलगुरू डॉ. फडणवीस यांनी विद्यापीठात महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र सुरू करण्यासाठी शासनाने मंजुरी देऊन तीन कोटी रुपये अनुदान दिल्याचे सांगितले. सूत्रसंचालन प्रा. ममता बोल्ली यांनी केले तर आभार डॉ. दत्ता घोलप यांनी मानले.

### पहिल्या दिवशी ७५ हजारांची देणगी!

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात शनिवारी महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचा उद्घाटन सोहळा झाला. या समारंभात मंगळवेढ्याचे बसव साहित्य प्रचारक डॉ. आप्पासाहेब पुजारी यांनी ५० हजार रुपयांचा धनादेश कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला. त्याचबरोबर अरविंद लोणी यांनी देखील २५ हजार रुपयांची देणगी दिली. महात्मा बसवेश्वर स्मारक समितीकडून महात्मा बसवेश्वर यांचे तैलचित्र भेट म्हणून देण्यात आले. यावेळी डॉ. बसवराज बगले, विजयकुमार हत्तुरे, डॉ. भीमाशंकर भांजे, जेष्ठ पत्रकार चन्नविर भद्रेश्वरमठ उपस्थित होते.

# सांगोला बाजार समिती कोणाची ?




✔ सुराज्य/सोलापूर

**कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक ३० एप्रिल रोजी सकाळी सात ते सायंकाळी चार वाजेपर्यंत मतदान होणार असून त्यानंतर त्याच दिवशी त्वरित सायंकाळी सहा वाजता पंचायत समिती कार्यालयातील बचत भवन येथे मतमोजणी केंद्र वॉईज होणार आहे. मतदानासाठी चार गावाची निवड केली असून त्या ठिकाणी ९ मतदान केंद्रे असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रमोद दुर्गुडे व सहाय्यक निवडणूक अधिकारी विलास घोडके यांनी दिली.**

## आज होणार फैसला

सांगोला येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पुजारी वाडी येथे तीन मतदान केंद्र असून त्या ठिकाणी सहकारी संस्थेचे ३१० मतदार ग्रामपंचायतीचे २०३ मतदार मतदान करतील तसेच व्यापारी व अडकत मतदारसंघातील तालुक्यात एकच केंद्र असून ते पुजारी वाडी येथेच असून या गटातील मतदार संख्या २५४ आहे ते तेथेच मतदान करतील.

या मतदान केंद्रात अकोला, अजनाळे, एकतपूर, कडलास, कमलापूर, चिंचोली देवळे, धायटी, बामणी, मांजरी, मेडशिंगी, मेथोडे, यलमार, मंगेवाडी, राजापूर, लिगाडेवाडी, वाडेगाव वासुद, संगेवाडी, सावे, सोनलवाडी, सांगोला येथील क्षेत्रीय माळी संस्था या गावांचा समावेश आहे

जवळा येथील जिल्हा परिषद मुलांची शाळा येथे मतदान केंद्र असून त्या ठिकाणी सहकारी संस्थेचे २३२ व ग्रामपंचायतीचे २०९ मतदार मतदान करतील येथे दोन मतदान केंद्र आहे. या केंद्रात आगलावेवाडी, आलेगाव, गळवेवाडी, गोडवाडी, घेरडी, जवळा, डिकसळ, डोंगरगाव, तरंगेवाडी, नराळे, निजामपूर, पारे, बुरंगेवाडी, बुरलेवाडी, बोपसेवाडी, मानेगाव, लोनविरे,वाकी घेरडी वाणी चिंचाळे, सोनंद, हंगेरगे, हनुमंत गाव ही गावे आहेत

नाझरे येथील जिल्हा परिषद शाळेत दोन मतदान केंद्र असून सहकारी संस्था २७३ मतदार व ग्रामपंचायत २२३ मतदार मतदान करतील या दोन मतदान केंद्रात अनकढाळ, उदनवाडी, कराड वाडी, कोंडबिसरी, कोंबडवाडी, कोळे, चिनके, चोपडी, जुजारपूर, जुनोनी, तिप्पेहाळी, नाझरे, पाचेगाव खुर्द, पाचेगाव बुद्रुक, बलवडी, बुद्धीहाळ, राजुरी, वझरे, वाटंबरे, सोमेवाडी, हटकर, मंगेवाडी, हातीद या गावाचा समावेश आहे

महूद बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळेत दोन मतदान केंद्र असून सहकारी संस्थेचे २३४ मतदार तर ग्रामपंचायतीचे १५१ मतदार मतदान करतील. या दोन मतदान केंद्रात आचकदानी, इटकी, कटफळ, कारंडेवाडी, खवासपूर, खिलारवाडी, गायगव्हाण, चिकमहुद, ढाळेवाडी, नरळेवाडी, बागलवाडी, महिम, महुद बुद्रुक, लक्ष्मी नगर, लोटेवाडी, वाकीशिवणे, शिरभावी शिवणे, हलदहिवडी या गावांचा समावेश आहे.

---



## स्वत:ला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम ठेवा : काकडे

✔ **सुराज्य/सोलापूर** : मानसिक दृष्ट्या सक्षम ठेवणे हेच सेवानिवृत्तीनंतर मजेत कसे जगावे याची गुरुकिल्ली आहे, असे उद्गार सोशल महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापिका डॉ. नभा काकडे यांनी काढले. त्या महाबँक पेन्शनर्स क्लब सोलापूरच्यावतीने समाजकल्याण सभागृहात आयोजित सेवानिवृत्तीनंतर 'मजेत कसे जगावे' या विषयावर बोलत होत्या. अध्यक्षस्थानी या क्लबचे अध्यक्ष प्रसाद अतनूरकर हे होते. त्यांनीच प्रास्ताविकात क्लबच्या संकल्पित कार्यक्रमाची दिशा स्पष्ट करत आढावा घेतला. डॉ. काकडे पुढे म्हणाल्या, 'सकारात्मक विचार ठेवल्याने आचार व शरीर दोन्ही चांगलं राहण्यास मदत होते. महिलांवरील कामाचा ताण कमी झाल्याने वातावरण आनंदी होण्यास मदत होईल. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन क्लबचे सचिव रवींद्र खमितकर यांनी केले. कार्यक्रमासाठी उपाध्यक्ष दीपक दबडे व खजिनदार खंडू फुलसे यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मोडनिंबच्या ग्रामदैवत वेताळबाबा यात्रा गुरुवारपासून प्रारंभ

✔ सुराज्य/मोडनिंब

**मोडनिंब व परिसरातील गावात एकमेव व सर्वांचे ग्रामदैवत असलेल्या श्री वेताळबाबा यात्रेला वैशाख शुद्ध त्रयोदशी गुरुवारी दि. ४ मे ते सोमवारी ८ मे पासून पाच दिवस होणार आहे, अशी माहिती वेताळ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष कुरण आण्णा गिड्डे, उपाध्यक्ष संभाजी लादे, सचिव विजय खेलबुडे यांनी दिली. मोडनिंब सह परिसरातील जाधववाडी, बैरागवाडी, तुळशी, ढेकळेवाडी, गिड्डे वाडी, अरण, भेंड, पडसाळी, शेटफळ, तेलंगवाडी, सोलंकरवाडी या गावातील लोकांची श्रद्धा वेताळबाबा यांच्यावर असल्याने ही यात्रा उत्साहात साजरी केली जाते.**

पारंपरिक पद्धतीने पाच दिवस चालणाऱ्या यात्रेत श्री वेताळ देवस्थान ट्रस्टच्यावतीने विविध सामाजिक उपक्रमाच्या मेजवानींचे आयोजन करण्यात आले आहे. त्याबरोबर पौराणिक कथावर आधारित तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात



आलेली प्रसिद्ध अशी सोंगे सादर करण्यात आली आहेत.

गुरुवारी ४ मे रोजी सकाळी नृसिंह जयंती निमित्त देवाला महाअभिषेक करून यात्रेला शुभारंभ होईल. सायंकाळी चार वाजता मंदिर परिसर सजावटीसाठी दुपारी तोरणमाळा देवस्थानकडे दत्त चौकातून वेताळबाबा मंदिरापर्यंत मोडनिंब गावातून मिरवणुकीने नेले जाणार आहेत. त्यानंतर सायं. ७ वाजता देव आणण्याचा कार्यक्रम होईल.

शुक्रवारी ५ मे पहाटे वेताळ देवाला सार्वजनिक महाअभिषेक व सायंकाळी देवाचा छबिना निघणार असुन पावसाची परंपरागत भाकणूक होणार आहे. शनिवारी ६ मे रोजी सकाळी देवाच्या पालखी सोहळ्याची मिरवणूक काढण्यात येणार आहे. सकाळी ९ वाजता ग्रामीण कलाकारांनी गाईलेली भेदी गाणी व कलगीतुरा असा कार्यक्रम होईल. संध्याकाळी डिजिटल युगातील कलाकार आधारित सोंगाच्या गाड्या निघणार आहेत. ७ मे रोजी दुपारी नेमून दिलेल्या मल्लाच्या कुस्त्यांचे मैदान आयोजित करण्यात आले आहे. ८ मे ला यात्रेचा शेवटचा दिवस असून या दिवशी 'माझा घर, माझा संसार' हे नाटक सादर करण्यात येणार आहे. या यात्रा उत्सवात सहभागी व्हावे व शांतपणे यात्रा महोत्सवाचा आनंद घेण्याचे आवाहन श्री वेताळ देवस्थान ट्रस्ट यांच्यावतीने अध्यक्ष कुरण आण्णा गिड्डे, उपाध्यक्ष संभाजी लादे, सचिव विजय खेलबुडे व यात्रेचे ईतर सर्व ट्रस्टी यांच्यावतीने करण्यात करण्यात आले

## ब्राह्मण समाज सेवा संघ - डॉ. चाटी ट्रस्टच्या पुरस्काराचे आज वितरण

✔ सुराज्य/सोलापूर

येथील ब्राह्मण समाज सेवा संघ आणि डॉ. त्रिंबक लक्ष्मण चाटी ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने जाहीर करण्यात आलेल्या जीवन गौरव आणि समाज भूषण या दोन्ही पुरस्काराचे वितरण रविवार दि. ३० एप्रिल रोजी होत आहे, अशी माहिती ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश कुमठेकर यांनी दिली आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा शिवस्वारक सभागृहात रविवारी सायं. ६ वाजता डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या हस्ते होत आहे. यावेळी पॅथॉलॉजिस्ट डॉ. अरविंद देखणे यांना जीवनगौरव आणि मूळचे सोलापूरचे असलेले आणि सध्या नाशिकमध्ये उद्योजक असलेले मुकुंद कुलकर्णी यांना समाज भूषण पुरस्कार देऊन गौरविला जाणार आहे. तरी या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष डॉ. कुमठेकर यांनी केले आहे.



## वरळेगाव येथे कुस्ती स्पर्धा

✔ **सुराज्य/द. सोलापूर** : येथे क्रांती मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने कुस्ती स्पर्धा पार पडल्या. या कार्यक्रमास प्रमुख म्हणून राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद गायकवाड, ठाकरे गट शिवसेना जिल्हा प्रमुख अमर पाटील, राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव संतोष पवार, केदार विभूते, भरत मेकाले, राजेंद्र कुलकर्णी, सुरेश कागे, सागर खांडेकर, पै. अप्पू साखरे, नागनाथ हक्के आदी उपस्थित होते. कार्यक्रमास आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडून प्रथम पारितोषिक ११००० रु. द्वितीय बक्षिस उपसरपंच विकास पवार ७००० रु. तृतीय बक्षिस सुनील कळके यांच्याकडून ५००० रू. देण्यात आले. अंतिम कुस्तीत वडजीचे पैलवान शिवाजी हवलदार यांनी बाजी मारली. कार्यक्रमास रासपचे जिल्हा संपर्क प्रमुख सरपंच श्रीमंत हक्के, शिवसेना नेते ग्रा. पं. सदस्य सखाराम वाघ, रासप जिल्हा उपाध्यक्ष यशवंत सोंडगे, ग्रा. पं. सदस्य भिवा कवडे, ज्येष्ठ नेते झुंबर भोसले, संस्थेचे अध्यक्ष किशोर चौधरी, उपाध्यक्ष अमर चौधरी, सचिव प्रदीप चौधरी आदींचे योगदान कार्यक्रमास लाभले.



## आमदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन

✔ सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास खात्याकडून सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोईसुविधांचा विकास योजनेअंतर्गत आमदार प्रणिती शिंदे यांच्या विशेष प्रयत्नातून जुना प्रभाग १२ कमटम वसाहत येथे डांबरी रस्ता करण्यासाठी दहा लाख रुपये बजेट मंजूर केले होते. त्या बजेटमधून होणाऱ्या रस्ता कामाचे भूमिपूजन आमदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी माजी शिक्षण मंडळ उपसभापती गोवर्धन कमटम, परिवहन सदस्य तिरुपती परकीपंडला, रामचंद्र बोलाबत्तीन, श्रीनिवास गाली, राजू नंदाल, गंगाधर देवसानी, तिरुपती सरगम, रमेश कमटम, गोवर्धन सरगम, व्यंकटनरसु कोंडा, रमेश विडप, नागेश चिलवेरी, सिद्राम चिंताकिंदी, अंबादास यंगल, श्रीनिवास कोमटी, संतोष चिलवेरी, अमर कोंडा यांच्यासह स्थानिय नागरिक उपस्थित होते.

## एमपीएससी परीक्षा कालावधीत प्रतिबंधात्मक आदेश जारी

✔ सुराज्य/सोलापूर

**महाराष्ट्र अराजपत्रित गट ब व गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा रविवार, दि. ३० एप्रिल रोजी होत असून, सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत (ग्रामीण भागामध्ये) परीक्षा कालावधीत सर्व परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये अपर जिल्हा दंडाधिकारी शमा पवार यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. हा आदेश महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे परीक्षेचे अनुषंगाने दि. ३० एप्रिल रोजी सकाळी ९ वा. ते दु. १ वा. या कालावधीत लागू राहील. या आदेशाची अवमानता केल्यास भारतीय दंड विधानाचे कलम १८८ नुसार गुन्हा नोंदवून फौजदारी कार्यवाही करण्यात येईल, असे आदेशात म्हटले आहे.**

यानुसार परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात पुढीलप्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. परीक्षा केंद्राच्या परिसरात कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाहीत. परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तिकडून शांततेस बाधा निर्माण होईल, असे कृत्य करण्यात येणार नाही.

परीक्षेशी संबंधित नसलेल्या व्यक्तिंना परीक्षा केंद्रात प्रवेश नसेल. केवळ संबंधित परीक्षा केंद्रावर नेमणूक केलेले मुख्याध्यापक/कर्मचारी, शासकीय कामावरील अधिकारी व कर्मचारी संबंधित परीक्षार्थी यांनाच परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश राहील, असे आदेशात म्हटले आहे.

**परीक्षा केंद्र व संबंधित पोलीस स्टेशनची नावे खालीलप्रमाणे :**

स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक), बाळे बार्शी रोड, सोलापूर (पो. ठाणे-तालुका पोलीस ठाणे, सोलापूर), मौलाना आझाद पॉलिटेक्निकल, द पोस्ट होटगी कुंभारी रोड, सोलापूर (पो. ठाणे-वळसंग पोलीस ठाणे), नागेश करजगी, आर्कीड कॉलेज ऑफ इंजिनिरिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी तुळजापूर रोड, सोलापूर (पो. ठाणे-तालुका पोलीस ठाणे, सोलापूर)

## इनामदार गुरुजी पुण्यतिथीनिमित्त आज धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

✔ **सुराज्य/सोलापूर** : सोलापूर व परिसरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सद्‌गुरु प्रभाकर स्वामी महाराज यांचे परमशिष्य श्री दिगंबर पांडुरंग इनामदार गुरुजी यांच्या ३९ व्या पुण्यतिथीनिमित्त वैशाख शुद्ध दशमीला रविवार, ३० रोजी सम्राट चौक येथील सद्‌गुरु श्री प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रभाकर स्वामी महाराज मंदिरामध्ये सकाळी ९ वाजता गुरु गीता पारायणाची समाप्ती होणार आहे. तसेच सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेपर्यंत भजन होईल. दुपारी १२ वाजता गुलालाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमांना उपस्थित रहावे, असे आवाहन मंदिर ट्रस्टचे चीफ ट्रस्टी दत्तात्रय देशमुख

# अनिष्ट रूढी, परंपरावर बंदी घालण्यासाठी जिजाऊ ब्रिगेड आग्रही : मनोरमा लावंड

✔ सुराज्य/अकलूज

समाजात आजही जुन्या रूढी परंपरा जपल्या जात आहेत यामुळे समाज व्यवस्था अंधकारात जाताना दिसत आहे यासाठी काळानुरूप बदल समाजाने स्वीकारले पाहिजे, परिवर्तनवादी विचार अंगिकारली पाहिजेत, अनिष्ट रूढी परंपरावर बंदी घालण्यासाठी जिजाऊ ब्रिगेड आग्रही, असे मत जिजाऊ ब्रिगेडच्या माळशिरस तालुकाध्यक्ष मनोरमा लावंड यांनी व्यक्त केले.



मराठा सेवा संघ प्रणित जिजाऊ ब्रिगेड सोलापूर जिल्हा पंढरपूर विभाग यांच्यावतीने अकलूज प्रांताधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यामध्ये विवाह सोहळ्यातील अनावश्यक खर्च टाळावा, समाजातील अनिष्ट रूढी परंपरा व अंधश्रद्धावर बंदी घालावी, दारूमुक्त वरात, वेळेवर लग्न, पतीच्या निधनानंतर त्याच्या विधवा पत्नीला होणारा सामाजिक त्रास याविषयी निवेदन देण्यात आले आहे. जिजाऊ ब्रिगेडच्या माध्यमातून सध्या हे आंदोलन संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेशाध्यक्ष माधुरी भदाणे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील कानाकोपऱ्यात राबवले जात असल्याचे यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रांतिक सदस्य शिवमती प्रिया नागणे, माळशिरस तालुका उपाध्यक्ष शिवमती मनीषा गायकवाड, अकलूज शहराध्यक्ष शिवमती शुभांगी क्षीरसागर, अकलूज शहर कार्याध्यक्ष शिवमती शारदा चव्हाण, संघटक शिवमती कल्पना चव्हाण, संघटक शिवमती सुवर्णा क्षीरसागर, संघटक शिवमती आशा सावंत उपस्थित होत्या.

## कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्याची मागणी

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेतील कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन श्रेणीनुसार आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वेतन निश्चिती करण्यात यावी यासह विविध मागण्यांचे निवेदन धर्मवीर शहर व हद्दवाढ कर्मचारी संघटना सोलापूर महापालिका यांच्यावतीने अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे आणि उपायुक्त विद्या पोळ यांना देण्यात आले.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून संघटनेच्या विविध मागण्यांवर कार्यवाही व्हावी, यामध्ये महापालिका सेवकांना सातव्या वेतन श्रेणीनुसार आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वेतन निश्चिती करण्यात यावी, अनुक्रमे १० वर्षानंतर, २० वर्षानंतर व तिसरी ३० वर्षानंतर अशाप्रकारे पदोन्नतीने वेतन निश्चिती देय असून त्याप्रमाणे ती लागू करण्यात यावी.

राज्य शासनाकडील प्रचलित महागाई व घरभाडे टक्केवारीप्रमाणे कर्मचाऱ्यांना ती लागू करावी आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मल्लिकार्जुन हुणजे, टाकळीकर, गुणेद, उपरे, दत्ता गायकवाड, मंजरतकर, ढेकणे आदी उपस्थित होते.

# महापालिकेतील कामगार-कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता लागू करण्याची घोषणा करावी

✔ सुराज्य/सोलापूर



**कामगार संघटना कृतीसमितीची मागणी**

यंदाच्या वर्षीही १ मे महाराष्ट्र आणि कामगार दिनानिमित्त महापालिकेतील सर्व कामगार-कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता आणि कामगारांच्या विविध मागण्या मान्य जाहीर करण्यात यावे या मागणीचे निवेदन महापालिका कामगार कर्मचारी संघटना कृती समितीच्यावतीने कामगार नेते अशोक जानराव यांच्यासह शिष्टमंडळाने आयुक्त शीतल तेली-उगले आणि अतिरिक्त आयुक्तांकडे देण्यात आले.

कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या मान्य करून त्या संदर्भातील अंमलबजावणी बाबतची जाहीर घोषणा आयुक्तांनी करावी आणि सर्व कामगारांचा आनंद द्विगुणीत करावा, शासनाकडील कर्मचाऱ्यांना सध्या ४२ टक्के महागाई भत्ता लागू आहे आणि सोलापूर महापालिका कर्मचाऱ्यांना केवळ १७ टक्के महागाई भत्ता मिळतो. यामध्ये तब्बल २५ टक्क्यांची तफावत असून ती दूर करण्यासाठी महागाई भत्त्यात जास्तीत जास्त वाढ करण्यात यावी. या व अशा इतर मागण्या निवेदनाद्वारे महापालिका प्रशासनाकडे करण्यात आल्या आहेत. यावेळी संघटनेचे सरचिटणीस प्रदीप जोशी, अजय क्षीरसागर, बाली मंडेपू, बाबासाहेब क्षीरसागर, तेजस्विता कासार, शशी शिरसाट, रेश्मा तलफदार, बाबासाहेब इंगळे, भारत क्षीरसागर, सिध्दी चंदनशिवे यांच्यासह पदाधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# सामाजिक कार्याच्या प्रेरणेतून राष्ट्राचा विकास होतो : वंजारवाडकर

✔ सुराज्य/सोलापूर

**सामाजिक आर्थिक परिवर्तनाकरिता अथक निरंतर परिश्रम करावे लागतात. सामाजिक कार्याच्या प्रेरणेतून राष्ट्राचा विकास होतो, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगराचे संघचालक रवींद्र वंजारवाडकर यांनी केले.**

**रा. स्व. संघ जनकल्याण समिती पश्चिम महाराष्ट्र संभागतर्फे शुक्रवारी 'अहर्निशं सेवामहे' या ग्रंथाचा पुनर्प्रकाशन सोहळा शुक्रवारी शिवस्मारक सभागृहात झाला.**

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे

**अहर्निशं सेवामहे ग्रंथाचे प्रकाशन**




याप्रसंगी व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक सुनील इंगळे, रा. स्व. संघ जनकल्याण समितीच्या पश्चिम महाराष्ट्र संभाग उपाध्यक्षा अलका पेठकर, जिल्हाध्यक्ष रंगनाथ जोशी यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. शुभांगी कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन तर रा. स्व. संघ जनकल्याण समितीच्या स्वावलंबन आयामाचे प्रमुख पी. आर. कुलकर्णी यांनी आभार मानले.

'समाजाच्या सहभागाने सामाजिक संस्कार होतात. ज्याची सेवा करायची त्याला परमेश्वर समजून काम केले पाहिजे. स्वच्छता, स्वावलंबनाचा संस्कार समाजसेवेतूनच रुजतो. समाजच सेवाभावी वृत्तीचा होईल. आणि सेवेची आवश्यकता राहणार नाही.'

रा. स्व. संघ जनकल्याण समितीचे जिल्हाध्यक्ष राजेश पवार यांनी प्रास्ताविक केले.

याप्रसंगी कार्यक्रमास शहर संघचालक राजेंद्र काटवे, विसूभाऊ गोडबोले, प्रवीण देशपांडे, विभाग कार्यवाह विनोद देशपांडे, प्रांत कार्यवाह तुकाराम नाईक, जनकल्याण समितीचे माजी अध्यक्ष रंगनाथ बंग, चंद्रीका चौहान, शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, संध्या ताम्हणे, उद्योजक सुनील पेंडसे, डॉ. हराळकर उपस्थित होते.



# भिवंडीत तीन मजली इमारत कोसळली

## तब्बल ४० ते ५० रहिवाशी अडकल्याची भीती

सुराज्य/ठाणे

ठाण्यातील भिवंडीच्या वलपाडा परिसरात तीन मजली इमारत कोसळल्याची मोठी बातमी समोर आली आहे. या दुर्घटनेत ४० ते ५० रहिवासी ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती वर्तवण्यात येत आहे. या घटनेची माहिती अग्निशामक दलाला मिळाली असता त्वरीत भिवंडी अग्निशामक दल, जवान, पोलीस हे घटनास्थळी दाखल झाले आहेत. तसेच ढिगाऱ्याखाली अडकलेल्या रहिवाशांना बाहेर काढण्याचं काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. कैलासनगर (वळपाडा) येथे वर्धमान कंपाउंडमध्ये शनिवारी दुपारी पावणे दोनच्या सुमारास जी-२ ही इमारत कोसळली. इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर साधारण तीन ते चार कुटुंब राहत होते. खालच्या मजल्यात कामगार काम करत होते. हे सारे जण इमारतीच्या ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त होत आहे. आलेल्या माहितीनुसार, ढिगाऱ्याखालून एक महिला आणि लहान बाळाला बचाव पथकाने नुकतेच सुखरुप बाहेर काढले आहे. मात्र, अद्यात ढिगाऱ्याखाली ३० ते ३५ जण अडकल्याचा अंदाज प्रत्यक्षदर्शींकडून वर्तवण्यात येत आहे.

सदर घटनास्थळी ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान यांच्या मदतीने सदर इमारतीच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या एकूण-०९ रहिवाशांची सुटका करण्यात आली असून, त्यांना शासकीय उपजिल्हा रुग्णालय भिवंडी येथे उपचारासाठी दाखल केले आहे.


### ठाण्यातून सात ते आठ रुग्णवाहिका दाखल

या दुर्घटनेनंतर ठाणे जिल्हा रुग्णालय प्रशासनाने तातडीने खबरदारी म्हणून ठाण्यातून सात ते आठ रुग्णवाहिका दाखल झाल्या आहेत. तसेच भिवंडी येथील इंदिरा गांधी रुग्णालयात ढिगाऱ्याखालून काढण्यात येणाऱ्या नागरिकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष करण्याचे आदेश देताना, जिल्हा रुग्णालयातही एक कक्ष तयार ठेवण्याच्या सूचना ठाणे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलाश पवार यांनी दिल्या आहेत. सदर घटनास्थळी प्रांत अधिकारी, तहसिलदार-भिवंडी, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी-ठाणे महानगरपालिका, ग्रामसेवक-भिवंडी ग्रामीण,पोलीस उपायुक्त परिमंडळ-०२, भिवंडी पोलीस कर्मचारी, दंगल गृहस्थ पोलीस, शासकीय उपजिल्हा रुग्णालय भिवंडीचे कर्मचारी-१० रुग्णवाहिका, भिवंडी अग्निशमन दलाचे जवान-०१ इमर्जन्सी टेंडर, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (NDRF) अधिकारी कर्मचारी ०१-आयशर टेम्पोसह, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे (TDRF) जवान-०१ बस वाहनासह, आपत्ती व्यवस्थापन कक्ष कर्मचारी (ठाणे महानगरपालिक, ठाणे) उपस्थित आहेत.

# शहा यांचा पुन्हा मुंबई दौरा

## राजकीय चर्चांणा उधाण

सुराज्य/मुंबई : राज्याच्या राजकारणात मोठ्या प्रमाणात घडामोडी घडत आहेत. भाजपकडून गुप्तपद्धतीने हालचाली सुरू आहेत. मागील काही दिवसांपासून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे महाराष्ट्रातले दौरे वाढत आहे. नवी मुंबई येथील खारघर या ठिकाणी महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा पार पाडला. या सोहळ्याला अमित शाह यांनी उपस्थिती लावली होती. मात्र, त्यानंतर आता पुन्हा एकदा अमित शाह हे मुंबई दौऱ्यावर असल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.



कोकणात बारसू येथे रिफायनरी प्रकल्पाचा वाद सुरू आहे. या वादावरून अनेक प्रकारच्या प्रतिक्रिया या राजकीय नेत्यांकडून येत आहेत. ग्रामस्थांचा या प्रकल्पाला तीव्र विरोध आहे. हे सर्व वाद सुरू असतानाच दुसरीकडे भावी मुख्यमंत्री म्हणून विरोधी पक्षनेते अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे बॅनर्स राज्यातील काही भागांत त्यांच्या समर्थकांकडून लावण्यात आले असून त्याची चर्चा होताना दिसत आहे.

# कलाकारांच्या मागणीसाठी अजितदादांचे शासनाला पत्र

सुराज्य/मुंबई : विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी राज्य सरकारला पत्र लिहून एक महत्त्वाची मागणी केली आहे. या पत्रातून त्यांनी कलाकारांसाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी केली आहे. ग्रामीण भागात आजही लोककलावंत आपली कला जोपासत आहेत. मात्र, त्यांच्या वृद्धापकाळात त्यांना कसलीही मदत मिळत नाही. परिणामी त्यांना हालाखीचे जीवन जगावे लागते. याची दखल घेत अजित पवारांनी राज्य सरकारला पत्र लिहिले आहे. शनिवारी त्यांनी ट्वीटरद्वारे या पत्राची माहिती दिली.

अजित पवार ट्विटमध्ये म्हणाले की, 'लोककलावंतांना वृद्धापकाळात सन्मानानं चांगलं जीवन जगता यावं, यासाठी तमाशासम्राज्ञी स्व. विठाबाई नारायणगावकर आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी पत्राद्वारे राज्य शासनाकडे केली आहे.'

# निकाल लागल्यानंतर आंध्रात ९ विद्यार्थ्यांची आत्महत्या

सुराज्य/हैद्राबाद

आंध्रप्रदेश बोर्ड ऑफ इंटरमिजिएट एक्जामिनेशनच्या पहिल्या आणि दुसऱ्या वर्षांचा (इयत्ता अकरावी आणि बारावी) निकाल बुधवारी जाहीर झाला.

मात्र हा निकाल जाहीर झाल्यानंतर अवघ्या ४८ तासांत तब्बल ९ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. तसंच, आणखी दोघांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याचेही समोर आले आहे. एनडीटीव्हीने यासंदर्भातील वृत्त दिले आहे. या परीक्षांना १० लाख विद्यार्थी बसले होते.

अकरावीचा रिझल्ट ६१ टक्के लागला असून बारावीचा निकाल ७२ टक्के लागला आहे. इंटरमिजिएट प्रथम वर्षाच्या परीक्षा १५ मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत आणि द्वितीय वर्षाच्या परीक्षा १६ मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत घेण्यात आल्या होत्या. या परिक्षेसाठी एकूण १० लाख ३ हजार ९९० विद्यार्थी बसले होते. यापैकी ४.८४ लाख विद्यार्थ्यांनी पहिल्या वर्षाची परीक्षा दिली होती, तर ५.१९ लाख विद्यार्थी दुसऱ्या वर्षासाठी बसले होते. या परीक्षांचा निकाल बुधवारी जाहीर करण्यात आला.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे मॉरिशसमध्ये अनावरण

सुराज्य/मुंबई : छ. शिवाजी महाराज यांच्या १२ फूट उंचीच्या अश्वारूढ पुतळ्याचे मॉरिशसच्या मोका येथे अनावरण करण्यात आलंय. पंतप्रधान प्रविंदकुमार जगन्नाथ आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार करण्यात आला.

मॉरिशस आणि महाराष्ट्र सरकार यांच्यातील संबंध देखील या पुतळा अनावरण सोहळ्यातून वृद्धींगत झाले आहेत. मॉरिशसमधील मराठी मंडळ फेडरेशनला महाराष्ट्र सरकारकडून भरघोस निधी मंजूर करण्यात आला. महाराष्ट्र भवनाच्या विस्तारीकरणासाठी राज्य शासनाने ८ कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. मॉरिशसमधील १० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले. मॉरिशसमधील मराठी आणि महाराष्ट्रीयन बांधवांना राज्यासोबत सतत संपर्कात राहता यावे, यासाठी एक कक्ष स्थापन करण्यात येईल, असंही त्यांनी घोषित केले. यावेळी मॉरिशसचे परराष्ट्र व्यवहार मंत्री लन गानू, मॉरिशसमधील भारताच्या उच्चायुक्त नंदिनी सिंगला, मॉरिशस मराठी मंडळ फेडरेशनचे अध्यक्ष आसंत गोविंद उपस्थित होते. मॉरिशसमधील मराठी भाषिक यावेळी पारंपारिक पोषाखात या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुण्यात दुचाकीचोरीचे मोठे रॅकेट उद्ध्वस्त

## पोलिसांकडून ५५ लाखांच्या १६२ दुचाकी जप्त

सुराज्य/पुणे

**पुणे शहरात दुचाकीचोरीच्या घटना वाढल्याच्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेच्या पथकांनी चोरांना पकडून ५४ लाख ६७ हजार रुपयांच्या १६२ दुचाकी जप्त केल्या. गेल्या काही वर्षांत पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने दुचाकी चोरट्यांच्या विरुद्ध केलेली आजवरची मोठी कारवाई आहे. या कारवाईमुळे दुचाकीचोरीच्या घटनांना पायबंद बसण्याची शक्यता आहे.**

गुन्हे शाखेच्या युनिट सहामधील पोलीस उपनिरीक्षक सुरेश जायभाय आणि नितीन मुंडे यांना दुचाकी चोरट्यांची माहिती मिळाली. या पथकाने सचिन कदम (वय ३२, रा. कळंब, जि. उस्मानाबाद), परमेश्वर मिसाळ (वय २८, रा. गोविंदपूर, ता. कळंब), अजय शेंडे (वय ३२) आणि युवराज मुंढे (वय २३, दोघे रा. सहजपूर, ता. दौंड) यांना गोविंदपूर येथून अटक केली. चौकशीत चोरट्यांनी पुणे शहरातून चोरलेल्या दुचाकी आरोपी अजय शेंडे, शिवाजी गरुड यांना विक्रिसाठी दिल्याचे उघडकीस आले. चोरट्यांनी पुण्यातील दुचाकींची लातूर, धाराशिव, बीड या शहरांमध्ये कागदपत्रे नंतर देतो, असे सांगून स्वस्तात विक्री केल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त रामनाथ पोकळे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

या चोरट्यांकडून शंभर दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. अजय शेंडे चोरट्यांच्या टोळीचा म्होरक्या असल्याची माहिती तपासात मिळाल्याचे उपायुक्त अमोल झेंडे यांनी सांगितले. युनिट पाचच्या पथकाने केलेल्या कारवाईत संकेत भिसे (वय २३), आदित्य मुळेकर (वय २०), वैभव बिनवडे (वय २०, तिघे रा. हडपसर) यांना पकडण्यात आले. त्यांच्याकडून पाच लाख ४० हजार रुपयांच्या १४ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. बिनवडे सराईत चोरटा आहे. युनिट चारने दुचाकी चोरटे राहुल पवार (वय २१, रा. आव्हाळवाडी, वाघोली), गौरव उर्फ पिंट्या कुसाळे (वय ३८, रा. वडारवस्ती, येरवडा), संतोष अशोककुमार सक्सेना उर्फ समीर शेख (वय २९, रा. कंजारभाट वस्ती, येरवडा), प्रशांत उर्फ पप्पू ठोसर (वय ३६, रा. आंबेडकर वसाहत, औंध) यांना अटक केली. त्यांच्याकडून पाच लाख ५५ हजार रुपयांच्या नऊ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. दरोडा आणि वाहन चोरी विरोधी पथकाने (दोन) किशोर शिंदे (वय ३०, रा. वेताळ वस्ती, मांजरी बुद्रुक), शाहिक कलिम शेख (वय १९, रा. दिगंबरनगर, वडगाव शेरी), अमन कनघरे (वय १९, रा. आंबेडकर वसाहत, चंदननगर), नागनाथ मेढे (वय २९, रा. साईनगर, वडगाव शेरी) आणि ओंकार टाटिया (वय २२, रा. कात्रज) यांना अटक केली. त्यांच्याबरोबर असलेल्या एका अल्पवयीन साथीदाराला ताब्यात घेण्यात आले असून चोरट्यांकडून पाच लाख ६७ हजारांच्या २१ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. गुन्हे शाखेच्या युनिट दोनने परभणीतील चोरटा भगवान राजाराम मुंडे (वय ३२) याला अटक करून १९ दुचाकी जप्त केल्या आहेत.



# ठाण्यातील ऐतिहासिक किल्ला नामशेष

## पुरातत्व विभागाची धक्कादायक कबुली

सुराज्य/ठाणे

राज्यातील गड-किल्ल्यांच्या संरक्षणासाठी राज्य सरकारकडून व्यापक प्रयत्न सुरू आहे. मात्र मुख्यमंत्र्यांच्या ठाणे शहरातील नागला बंदर येथील ऐतिहासिक किल्ला दगडखाणी आणि क्रशर मशीनचालकांनी नामशेष केल्याची धक्कादायक कबुली पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाकडून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, नागला बंदर किल्ला हे राज्य संरक्षित स्मारक नसल्याचे सांगत हा किल्ला वाचवण्यासाठी महाराष्ट्र प्राचीन स्मारके व



पुराणवस्तू शास्त्र विषयक स्थळे व अवशेष या अधिनियमान्वे याच्या संरक्षणाबद्दल कारवाई करण्यास अडचणी येत असल्याची हतबलता संचालक तेजस गर्गे यांनी व्यक्त केली आहे.

वसई मोहिमेवर निघालेल्या चिमाजी आप्पा यांनी ठाण्याचा नागला किल्ला पोर्तुगीजांच्या ताब्यातून जिंकला आणि त्यानंतर वसई मोहीम फत्ते केली, मराठ्यांच्या शौर्याचा इतिहास सांगणारा नागला किल्ला सध्या अखेरच्या घटका मोजत आहे. ज्या ठिकाणी किल्ला होता त्या ठिकाणी फक्त भग्न अवस्थेतील दोन भिंती असून त्या भिंतींवरच खडी क्रशरसाठी लागणारे साहित्य व भंगार सामान ठेवल्यामुळे तेही दिसत नाही. हा किल्ला ऐतिहासिक वास्तू असून त्याचे पुनरुज्जीवन करण्याची मागणी आमदार सरनाईक यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.



# एकनाथ खडसेंना मोठा धक्का

## भुसावळ बाजार समिती निवडणुकीत भाजप-शिंदे गटाचे एकहाती वर्चस्व

सुराज्य/जळगाव

भुसावळ बाजार समितीत भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या शेतकरी विकास पॅनलने १८ पैकी १५ जागांवर विजय मिळवत बाजार समितीवर एक हाती सत्ता मिळवली. दुसरीकडे महाविकास आघाडीच्या शेतकरी सहकार पॅनलला केवळ तीन जागांवर यश मिळालं आहे. हा निकाल महाविकास आघाडीचे नेते एकनाथ खडसे व माजी आमदार संतोष चौधरी यांना मोठा धक्का मानला जात आहे. भुसावळ बाजार समितीच्या निवडणुकीसाठी मतमोजणीला सकाळी १० वाजता सुरुवात झाली.

भुसावळ बाजार समितीत भाजप-शिंदे गटाचे शेतकरी विकास पॅनल तर दुसरीकडे महाविकास आघाडीचे शेतकरी सहकार पॅनल निवडणुकीच्या रिंगणात होते. दीड तासांतच याठिकाणची मतमोजणी संपली आहे. यामध्ये १८ पैकी जागांवर १५ जागांवर भाजप शिंदे गटाच्या शेतकरी विकास पॅनलचे उमेदवार विजयी झाले आहेत. तर महाविकास आघाडीचे शेतकरी सहकारी पॅनलचे उमेदवार केवळ तीन जागांवर विजयी झाले आहेत.

# मनोज सौनिक राज्याचे नवे मुख्य सचिव

सुराज्य/मुंबई



मनुकुमार श्रीवास्तव यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणाऱ्या मुख्य सचिव पदावर वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मनोज सौनिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाने शुक्रवारी सौनिक यांच्या नियुक्तीचा आदेश काढला.

राज्याचे ४६वे मुख्य सचिव म्हणून सौनिक रविवारी संध्याकाळी पदभार स्वीकारतील. श्रीवास्तव यांची मुख्य सेवा हक्क आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

सौनिक यांची मुख्य सचिवपदी नियुक्ती झाल्यानंतरही सरकारने त्यांच्याकडे वित्त आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदाचा कार्यभार पुढील आदेश येईपर्यंत कायम ठेवला आहे.

## हालाखीची परिस्थिती

# चारही भावंडांची पोलीस दलात नियुक्ती

सुराज्य/पुणे

**जुन्नर तालुक्यातील वडगाव आनंद येथील एका शेतकरी कुटुंबातील चारही बहीण-भावांची पोलीस दलात निवड झाली आहे. चारही मुलांनी पोलीस दलात जाण्याचं स्वप्न बापाने पाहिलं होतं आणि त्या चारही मुलांनी वडिलांचं स्वप्न पूर्ण करुन दाखवलं आहे. वडिलांचे स्वप्न पूर्ण झाल्याचा त्यांना अतिशय आनंद आहे. दिपक गाडेकर, अंकिता गाडेकर, सारिका गाडेकर आणि आशा गाडेकर अशी या चार भावंडांची नावं आहेत.**

जुन्नर तालुक्यातील वडगाव आनंद परिसरात विजय गाडेकर यांचं कुटुंब राहतं. त्यांचा मूळचा व्यवसाय शेती आहे. घराची परिस्थिती हलाखीची... परिस्थितीमुळे आपल्याला शिकता आलं नाही, पण आपल्या मुलांना आपण सरकारी नोकरीत म्हणजे पोलीस खात्यात भरती करायचं असं त्यांचं स्वप्न होतं. त्यानुसार त्यांनी चारही मुलांना पाठींबा देत पोलीस भरतीच्या तयारीसाठी सह्याद्री नावाच्या करिअर ॲकॅडमीमध्ये पाठवलं.

त्या करिअर ॲकॅडमीचे शिक्षक मयूर डुंबरे आणि अनिकेत घोडेकर यांनी देखील मेहनत घेत त्यांना इथपर्यंत पोहचण्यास मदत केली. वडिलांचं स्वप्न पूर्ण झाल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आहे. या चारही भावंडांची महाराष्ट्र पोलीस दलात नियुक्ती झाली आहे. या चारही भावंडांना पहिल्यापासूनच शालेय जीवनात अभ्यासाची गोडी होती. आपण काहीतरी करू शकतो अशी जिद्दही त्यांना होती. त्यांचं शालेय शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडगाव आनंद, उच्च शिक्षण बाळासाहेब जाधव महाविद्यालय आळे या ठिकाणी पूर्ण केलं.



सर्वात आधी आशा गाडेकर यांची २०१४ साली यांची पुणे शहर पोलीस दलात नियुक्ती झाली. त्यानंतर सारिका गाडेकर यांची २०११ साली पुणे शहर पोलीस दलात नियुक्ती झाली. या दोघी देखील विवाहित असून सध्या त्या पुण्यामध्ये स्थायिक आहेत. त्यानंतर यावर्षी अंकिता गाडेकर आणि तिचा भाऊ दिपक गाडेकर हे दोघे देखील पोलीस दलात रुजू झाले आहेत. अंकिता ही पुणे शहर पोलीस दलात कार्यरत होणार आहे, तर दीपक हा रायगड पोलिसात रुजू होणार आहे.

एकामागे एक चारही भावंडांनी महाराष्ट्र पोलीस दलामध्ये भरती होऊन एक आदर्श समाजापुढे निर्माण केला आहे. आई-वडिलांच्या अथक कष्टाचं चीज या चारही मुलांनी केलं आहे. जुन्नर तालुक्यातल्या वडगाव आनंद या ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या या कुटुंबाचं नाव त्यांनी मोठं केलं. तसंच आपल्या आई वडिलांना अभिमान वाटेल अशी कामगिरी केली आहे. सर्व परिसरातून आणि वडगाव आनंद ग्रामस्थांकडून चारही भावंडांचं कौतुक केलं जात आहे.

# कॅलिफोर्नियात जातिभेद निर्मूलन विधेयक मंजूर

सुराज्य/नवी दिल्ली

जातिभेदावर निर्बंध आणणारे विधेयक कॅलिफोर्नियामध्ये मंजूर करण्यात आले आहे. या विधेयकाला अमेरिकेतील उद्योजक आणि मंदिर व्यवस्थापनांनी जोरदार विरोध केला होता.

कॅलिफोर्निया सिनेट ज्युडीशरी समितीने मंगळवारी हे विधेयक मंजूर केले. आता हे विधेयक सिनेटकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आले आहे. जातिभेदाविरोधात मंजूर झालेले अमेरिकेतील राज्यातील हे पहिले विधेयक आहे. सिनेटने हे विधेयक मंजूर केले तर कॅलिफोर्निया अमेरिकेतील पहिले राज्य ठरेल जेथे जातिभेद निर्मूलन कायदा लागू होईल. तसेच जगातील अमेरिका हा पहिला देश ठरेल जेथे जातिभेदाला तडा देणारा कायदा असेल. जाती अत्याचाराविरोधात लढा देणाऱ्या संस्थांचा मला अभिमान आहे. त्यांच्यामुळे तेथील जाती अत्याचाराला आळा बसणार आहे.

# गारपीट नव्हे मारपीट





बळीराजाला जगाचा पोशिंदा म्हटले जाते. तो जेव्हा तिफणीवर हात ठेवून धरतीमातेची ओटी भरतो आणि चांगला पाऊस झाला की धरतीच्या पोटातील बीजाला अंकुर फुटतो. फुटलेल्या अंकुराला पोटच्या पोरासारखे जपल्यानंतर, त्याला वाढवल्यानंतर पिकते ते धान्य. त्याच धान्यावर जगाचे पोट भरते. म्हणून शेतकऱ्याला जगाचा पोशिंदा म्हटले जाते. शेतकऱ्याचा हा धंदा पूर्णतः निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असतो. हा निसर्गही अनेकवेळा शेतकऱ्यावर कोपतो. कधी पाऊस पडतच नाही. त्यामुळे कोरडा दुष्काळ पडतो. कधी पाऊस अति पडतो; त्यावेळीसुध्दा शेतकऱ्याला ओल्या दुष्काळाला सामोरे जावे लागते. याशिवाय कधी कधी याच निसर्गाचा असा चमत्कार होतो की पावसाऐवजी गारा पडतात. अशावेळी शेतकऱ्याला फायदा होण्याऐवजी फटका बसतो. हातातोंडाला आलेला घास गारपिटीमुळे हिरावला जातो. त्यामुळे अनेकवेळा गारपीट ही मारपीट बनून शेतकऱ्याच्या मानगुटीवर बसते. तेव्हा शेतकऱ्याचे कंबरडे तर मोडतेच. शिवाय ही गारपीट इतर अनेक घटकांचेही नुकसान करून जाते. त्यामुळे खरोखरच गारपीट ही मारपीट ठरते. म्हणून आज गारपीट म्हणजे काय? गारा कशा तयार होतात? त्यांचा फटका कसा बसतो? यासंदर्भातील रंजक माहिती खास 'सुराज्य'च्या वाचकांसाठी 'संडे मॉर्निंग'मधून देण्याचा हा प्रयत्न. आपल्याकडे पाऊस जेव्हा पडतो, तेव्हा पाण्याचे थेंब ढगातून जमिनीवर पडतात. पण या पाण्याच्या थेंबांच्या जागी जर बर्फाचे छोटे छोटे गोळे जेव्हा पडतात; तेव्हा त्याला गारांचा पाऊस असे म्हटले जाते. ह्या गारा जमिनीवर पडल्यानंतर वितळून पाणी होते. ह्या गारा छोट्या असतील तर फार काही नुकसान होत नाही. पण ह्या गारा आकाराने मोठ्या असतील तर मात्र पिकांचे नुकसान होते. त्यावेळी गारपीट ही शेतकऱ्यांसाठी मारपीट ठरते.

## गारा कशा तयार होतात?



वारे नेहमी जास्त दाबाकडून कमी दाबाकडे वाहतात. पृथ्वीवर जेव्हा एखाद्या ठिकाणी कमी दाबाचा पट्टा निर्माण होतो; त्यावेळी दुसऱ्या ठिकाणी जास्त दाबाचा पट्टा तयार होतो. म्हणजेच जास्त दाबाच्या पट्ट्याकडून कमी दाबाच्या पट्ट्याकडे वारे वाहतात. जर हे वारे कोरडे असतील तर ते आकाशात उंच उंच जातात. तेच वारे जर बाष्पयुक्त असतील तर ते तितके उंच जात नाहीत. वरचा थर कोरड्या वाऱ्यांचा आणि खालचा थर बाष्पयुक्त वाऱ्यांचा अशी वातावरणीय स्थिती असेल तर ती गारा तयार होण्यासाठी उपयुक्त असते. अर्थात फेब्रुवारी-मार्च महिन्यात बंगालच्या उपसागरावर हवेच्या जास्त दाबाचा पट्टा तयार होतो. ते वारे कमी दाबाच्या पट्ट्याकडे वाहू लागतात. या वाऱ्यांमध्ये बाष्प असतात. कधी कधी अरबी समुद्रावरूनही अशा प्रकारचे बाष्पयुक्त वारे वाहतात. आकाशात वरच्या थरातील कोरडे वारे आणि खालच्या थरातील बाष्पयुक्त वारे असतात. आकाशात वाऱ्यातील बाष्पाचे छोटे छोटे थेंब एकमेकांशी चिटकून एक मोठा थेंब बनतो. हे थेंब गोठले जातात. गोठलेल्या बाष्पाच्या थेंबालाच गारा म्हणतात. ह्या थेंबाला जास्त बाष्पकण चिकटले तर तो थेंब मोठा होतो. म्हणजेच गारा मोठ्या होतात. मोठ्या झालेल्या गारा वातावरणातील हालचालींमुळे जमिनीवर कोसळतात. त्यालाच गारांचा पाऊस असे म्हटले जाते.

## गारांमुळे शेतीपिकांचे नुकसान


जेव्हा गारांचा पाऊस पडतो तेव्हा या गारांचा मारा शेतातील पिकांवर होतो. या काळात द्राक्ष, आंबा, पपई, काही ठिकाणी ज्वारी, गहू अशी पिके असतात. या गारांच्या माऱ्यापुढे द्राक्ष फुटतात. पपई, आंबा यासारखी फळपिके गळून पडतात. ज्वारी, गहू यासारखी धान्यपिके कोलमडून पडतात. कणसातील दाणे खराब होऊन मातीमोल होतात. उसासारख्या नगदी पिकांनाही फटका बसतो. कारण या काळात बहुतांश ऊसतोड झालेली असते. नवीन फुटवा फुटायला सुरुवात झालेली असते. गारांच्या माऱ्यामुळे उसाचा कोवळा फुटवा अधू होतो किंवा तुटून पडतो. परिणामी ऊस पिकाची वाढ खुंटते.



## ढगफुटी म्हणजे काय?

एखाद्या परिसरात अतिशय जोरात आणि मुसळधार पाऊस पडणे म्हणजे ढगफुटी होय. हवामान विभागानुसार जेव्हा एखाद्या १० ते १५ किलोमीटर एवढे अंतर असलेल्या परिसरामध्ये एका तासाच्या कालावधीत १० ते १२ सेंटिमीटर पेक्षा जास्त पाऊस पडतो, तेव्हा त्यास ढगफुटी असे म्हटले जाते. ह्या परिस्थितीत एकापेक्षा जास्त ढग एकावेळी फुटण्याची शक्यता असते.





## कृत्रिम पाऊस म्हणजे काय

पाऊस पाडण्यासाठी ढगांमधल्या बाष्पाची क्षमता, तापमान, वाऱ्याची दिशा आणि वेग असे अनेक घटक आवश्यक असतात. यातल्या कोणत्याही एका घटकाचा असमतोल झाल्यास पावसाची शक्यता कमी होते. अशावेळी ढगांमधील बाष्पाचे प्रमाण वाढवून ते विशिष्ट तापमानाला थंड केले की त्याचे पाण्याच्या थेंबांमध्ये रूपांतर होते. काळ्या ढगांवर विशिष्ट परिस्थितीत रसायने फवारून पाऊस पाडणे, म्हणजेच कृत्रिम पाऊस होय. ढगांवर रसायने फवारून पाऊस पाडण्याप्रमाणेच गारांचा आकार कमी करण्यासाठीसुद्धा या प्रयोगांचा उपयोग केला जातो. हवेतले बाष्प एकत्र येऊन पावसाचा थेंब बनण्यासाठी एखाद्या लहानशा कणाची आवश्यकता असते. एखादा सूक्ष्म कण हा पावसाच्या थेंबाच्या केंद्राची भूमिका बजावतो. या केंद्रावर बाष्प जमा होत जाते आणि त्याचा आकार वाढला की तो पावसाचा थेंब म्हणून जमिनीवर पडतो. पण ही पावसाच्या थेंबाची निर्मिती नैसर्गिकरीत्या थांबते, तेव्हा ती कृत्रिम रित्या घडवून आणावी लागते. यासाठी काळ्या ढगांवर सोडियम क्लोराईड म्हणजेच मिठाचे कण फवारले जातात. मिठाच्या पाणी शोषण्याच्या गुणधर्मामुळे या कणांभोवती ढगातील बाष्प जमा होते. त्याचा आकार वाढला की बाष्प पावसाचे थेंब म्हणून खाली पडते. एकदा ही क्रिया सुरू झाली की पाऊस पडायला सुरुवात होते. काळ्या ढगांप्रमाणेच अधिक उंचीवर असलेल्या पांढऱ्या ढगांमधूनही पाऊस पाडता येतो. त्यासाठी सिल्व्हर आयोडाईड फवारले जाते. अमेरिका, इस्रायल, चीन, कॅनडा, रशिया, आफ्रिकेतील काही देश आणि युरोपीय देशांमध्येसुद्धा असे प्रयोग केले जातात. चीन येथे ऑलम्पिक पूर्वी तर रशियातही असा प्रयोग झाला होता. अमेरिका, कॅनडासारख्या ठिकाणी गारांचा आकार फार मोठा असतो. तिथेसुद्धा सोडियम आयोडाईडचे कण फवारले की गारांची संख्या वाढते, पण त्यांचा आकार कमी होऊ शकतो.

## ढगफुटी का होते?

जेव्हा हवेतील वातावरणामधील आद्रतेचे प्रमाण खूपच जास्त वाढलेले असते आणि हवेतील उष्णतेचे प्रमाण देखील खूपच अधिक असते; अशावेळी कोसळणाऱ्या ढगांची निर्मिती होत असते.हे ढग जेव्हा आपले मार्गक्रमण करीत असतात तेव्हा त्यांच्यावर खूप अधिक भार असतो. अशावेळी ह्या ढगांच्या समोर एखादा डोंगर आडवा आला आणि ढगांना पुढे जाता येईना झाले तर त्यांच्यावर असलेल्या अधिकतम वजनाने त्यांचा तोल जाऊन ते जोरात फुटत असतात. त्यालाच ढगफुटी झाली असे म्हणतात. याशिवाय जेव्हा दोन वेगवेगळे ढगांचे प्रवाह एकाचवेळेस एकत्र येतात; तेव्हा त्या दोघांचा मिळून एक मोठा एकत्र भार तयार होत असतो आणि हा भार कुठल्याही छोट्याशा परिसरात काही क्षणांतच कोसळतो, त्यालाही ढगफुटी झाली असेच म्हणतात.

## ढगफुटीची कारणे

१. जेव्हा गरम हवेचा काही भाग थंड हवेच्या संपर्कात येतो; तेव्हा अचानक मुसळधार पाऊस पडतो. गरम बाष्प तुलनेने थंड बाष्पासोबत एकत्र आल्यानंतर त्यांची गती वाढते आणि वेगाने पाण्याचा थेंब मोठ्या आकारात कोसळतात.

२. बंगालच्या खाडीमध्ये आणि अरब समुद्रामध्ये तयार झालेले कमी दाबाचे पट्ट्यामुळे अचानक पाऊस पडतो. भारताच्या उत्तर भागात एका तासात ७५ मी पर्यंत पाऊस पडतो.

## अवकाळी पाऊस म्हणजे काय?

मान्सून किंवा मान्सूनपूर्व कालावधीव्यतिरिक्त इतर वेळी पाऊस पडतो तेव्हा त्याला अवकाळी पाऊस असे म्हणतात. हा चेतावणीशिवाय येतो आणि जेव्हा आपण त्याची किमान अपेक्षा करतो. अनेकदा अवकाळी पावसासोबत गारपीट देखील होते, यामुळे शेतीचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान होते. पाण्याच्या बाष्पीभवनाच्या वाढत्या प्रमाणामुळे अवकाळी पाऊस पडतो चक्रीवादळे आणि गारपीट देखील मोठ्या प्रमाणात होते.

## तुटपुंजी नुकसान भरपाई

गारपीट, अवकाळी, ढगफुटीनंतर झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी म्हणून शेतकऱ्यांमधून जोरदार मागणी होते. शासनही नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश देते. त्याप्रमाणे संबंधित शासकीय यंत्रणा कामाला लागते. सगळी दिव्यप्रक्रिया पार पडल्यानंतर जेव्हा प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या हातात भरपाईची रक्कम पडते; ती नुकसानीच्या तुलनेत अतिशय तुटपुंजी असते. किंबहुना नुकसानग्रस्त पिकासाठी केलेला खर्चही त्या भरपाईमधून निघत नाही. परिणामी खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांनाच नुकसान सहन करावे लागते.

## आत्महत्येचे प्रमाण वाढले

शेतकरी शेतात पीक घेण्यासाठी विविध माध्यमातून कर्ज घेतो. पाऊस चांगला पडेल, पीक भरघोस येईल आणि उत्पन्न चांगले मिळेल, या आशेवरच तो कर्जाचा आटापिटा करत असतो. अशातच गारपीट, अवकाळी आली आणि हातातोंडाशी आलेला घास गळून पडला तर शेतकरी उध्वस्त होतो. त्यावेळी घेतलेले कर्ज कसे फेडायचे? हा सर्वात मोठा प्रश्न शेतकऱ्यासमोर असतो. पावसाने झोडपले आणि शासनाने छळले तर तक्रार कुणाकडे करायची? घेतलेले कर्ज फेडल्याशिवाय पर्याय नसतो आणि कर्ज फेडण्यासाठी हातात पैसा नसतो. अशावेळी जर कर्जदाराकडून वसुलीचा तगादा लावला गेला, तर वैतागलेल्या शेतकऱ्यासमोर आत्महत्येशिवाय दुसरा पर्यायच उरत नाही. त्यातूनच शेतकरी आत्महत्या करण्याचा मार्ग निवडतो. अलीकडे कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण महाराष्ट्रात वाढले आहे.

## गरज दीर्घकालीन उपाययोजनेची

शेतकरी जगला तर प्रत्येकजण जगणार आहे. जगाचा पोशिंदा जगला तर जग जगणार आहे. शेतकऱ्याने पिकवलेच नाही तर खाणाऱ्याने काय खायचे? असा प्रश्न निर्माण होतो. नैसर्गिक आपत्ती ही काही सांगून येत नाही. पण अशी आपत्ती आली तर आपतग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी शासनाने उभे राहिले पाहिजे. म्हणजेच शेतकऱ्यांना पुरेशी नुकसान भरपाई ही मिळालीच पाहिजे. अशावेळी कर्जबाजारी शेतकऱ्याने कर्जातच मरू नये; यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करणे गरजेचे आहे. निसर्गाचा लहरीपणा कोणाच्या हातात नाही. पण असा लहरीपणा आलाच तर जगाला जगवण्यासाठी जगाला जगवणाऱ्या शेतकऱ्याला जगवण्याची रास्त भूमिका शासनाने घेतली तरच शेतकरी जगणार आहे.

संकलन व संपादन : राजकुमार नरुटे | मांडणी व सजावट : अभिषेक उघडे